



थेंबा थेंबात अमृत...

# शिवामृत®

1976 पासून विश्वसनीय नाव....







कॉफी, कोल्डकॉफी, बदाम ड्रिंक टीन मध्ये उपलब्ध

स्वामीराज ॲड्स् 95037 73073

**रविराज शंकरराव इनामदार-देशमुख**
कार्यकारी संचालक

**दत्तात्रय रामचंद्र भिलारे**
व्हा.चेअरमन

**खा.धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील**
चेअरमन

**सर्व संचालक मंडळ, सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग**

## शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर-अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर

Phone : 02185 - 222126/222566 • Email: shivamrutakluj@gmail.com

सोलापूर, सातारा, पुणे, मुंबई, नवी मुंबई, नांदेड, लातूर येथे सुपर स्टॉकिस्ट नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.




# सोलापूरचे साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्र

**सोलापूर हे शहर तसं महाराष्ट्राच्या एका कडेला आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेश हे सोलापूरपासून हाके एवढ्या अंतरावर आहे. पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, आणि गाणगापूर ही भक्ती आणि शक्तीपीठं सोलापूर पासून तासाभराच्या अंतरावर आहेत, आता बंद पडलेल्या कापड गिरण्या यंत्रमाग आणि क्षीण झालेले हातमाग, विडी उद्योग आणि असंच काही फारसं लक्षात न येणारी बरीच वस्ती मजुरांची, कामगारांची, मराठी बोलणारे मोठ्या संख्येने असले, तरी तेलुगु, कन्नड आणि हिंदी बोलणारे ही संख्येने कमी नाहीत. संस्कृत अध्ययन आणि मातृभाषा मराठी यांचा संगम होऊन कविराय राम जोशी नावाचा प्रतिभासंपन्न शाहीर कवी सोलापूरने महाराष्ट्राला दिला. आप्त स्वकीयांशी बंड करून राम जोशी यांनी स्वतःचा तमाशा फड उभा केला. एकाहून एक ललित सुंदर आणि रसमधुर लावण्यांनी स्त्री रूप विभ्रमाचा त्यांनी गौरव केला त्यांनी शृंगारिक लावण्या तर लिहिल्याच पण उपरती नंतर जे आध्यात्मिक प्रबोधन पर काव्यलेखन केलं त्याला तोड नाही.**

'माय कुणाची व्याली। गगनाखाली। ऐशी कविता सोलापुरी' ।। असं आवाहन हा कवी त्याकाळी करायचा सोलापुरी कवितेचा अभिमान बाळगणारे कविराय राम जोशी हे आमच्या सोलापूरचा मानबिंदू आहे.त्यानंतर स्वातंत्र्य संग्रामात ज्यांनी आपलं सर्वस्व अर्पण केलं लेखणीचा मंत्र सामर्थ्य किती प्रेरक असतं हे त्यांनी जगाला दाखवून दिलं, व्यक्तिगत संसाराकडे पाठ फिरवून समाज आणि देश यांचं वाण हाती घेणे हे त्या काळाचं धगधगतं दिव्य होतं ती एक लखलखती वीज होती. या कवीने असंख्य कविता लिहिल्या त्यापैकीच भेटेन नऊ महिन्यांनी आणि मुळशीचा पाळणा या कविता अख्ख्या महाराष्ट्रात चौकाचौकातून जथ्या- जथ्यानं घुमू लागल्या ही गीतं गाऊन सत्याग्रह होऊ लागले. हे अद्भुत रसायन रक्तात मिसळले आणि मराठी मुलखातील तृणपथ्यालाही तलवारीची धार आली,ती हरिहर गुरुनाथ सलगरकर म्हणजेच कवी कुंजविहारी यांच्या मूळेच त्यांचे नाव तेंव्हा हिंदुस्थानभर अविस्मरणीय झालं. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी डॉ. वि. म. कुलकर्णी हे आज जरी पुण्यात राहत होते. तरी त्यांनी आपल्या उमेदीची दोन तपे सोलापुरात काढली होती. त्यांनी काव्यलेखन केले साधी-सोपी कौटुंबिक तरी सामाजिक झालर असलेली त्यांची कविता शारदेच्या दरबारात समईतील संथ ज्योतीसारखी तेवत होती. ५० वर्षांपेक्षा अधिक काळ पटावर आपल्या कवितांचा आणि गीतांचा मनावर ठसा उमटवणारे कृ. ग. दीक्षित म्हणजेच कवी संजीव यांनी विपुल काव्यलेखन केलं. राम जोशी नंतर कवी संजीवांच्या कविताने चरणात चाळ बांधून लावणीचं मोहिनी स्वरूप धारण केलं होतं, 'अत्तराचा फाया,तुम्ही मला आणा राया' ही लावणी कवी संजीव यांचीच 'गोरं-गोरं पान जस केवड्याचं रान', अशा लावण्यांनी कवी संजीव यांनी रसिकांची मनं जिंकली 'सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती ओवाळीते भाऊराया वेड्या बहिणीची वेडी ही माया', या त्यांच्या भावगीतांनी घराघरात प्रवेश मिळवला त्यांनी बारा चित्रपटांसाठी गाणी लिहिली, त्यांची ही गाणी लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर, सुधीर फडके आदी श्रेष्ठ गायकांनी गायली आहेत.

'सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले', क्षणभर उघड नयन देवा' ही गाणी आपण आकाशवाणीवरून नेहमीच ऐकतो ही गाणी आहेत, सोलापूरच्या कवी रा. ना. पवारांची, रा.ना. पवार हे रेल्वे खात्यात नोकरीला होते. तरीही कलासक्त मन, रसिकता आणि सदैव लेखनाची धुंदी घेऊनच ते जगले त्यांनी सुरुवातीला मेळ्यात गाणी लिहिली, समरगीतं लिहिली, त्यांच्या भावगीतांच्या रेकॉर्डस् निघाल्या केवळ परिस्थितीमुळे त्यांच्या हयातीत त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित होऊ शकला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर 'सावळ्या विठ्ठला'हा कविता संग्रह प्रसिद्ध झाला.कवी मा.गो. काटकर यांनी आजन्म काव्यलेखन केलं जय-जयवंती, मधूधारा, मनमाधवी आणि भैरवी हे त्यांचे काव्यसंग्रह त्यांनी बालसाहित्याची ८० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली तर 'आरपार नगरात' या त्यांच्या बालकविता संग्रहाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. 'बखर एका राजाची', 'उच्छाद', 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबऱ्या गडकऱ्यांची संसारनाटके शारदीय चंद्रकला, अंधार यात्रा, आदी ग्रंथाचे लेखक महाराष्ट्रातले थोर समीक्षक प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख हे एके काळी 'वैशाख' या नावाने कविता लिहीत होते. 'उत्तररात्र'आणि 'कविता चंद्र केतूची' हे त्यांचे रसिकमान्य कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. बार्शीच्या अमरशेख या शाहिराने आपल्या बुलंद आवाजात ज्वालाग्राही कविता महाराष्ट्राला सादर केली देशभक्तीचा मंत्र असलेली त्यांची कविता अजून काही जणांच्या ओठावर आहे. करमाळ्यात शीघ्रकवी डांगे नावाचे एक आश्चर्यकारक व्यक्तिमत्व होऊन गेले विषय कुठलाही असो डांगे एका क्षणात कोणत्याही विषयावर कविता रचून म्हणायला सुरुवात करीत असत. प्रा. प्रभाकर बिडवे हे करमाळ्यातील त्यांची 'जीवनलहरी' ही सुंदर कविता त्यांच्या चिंतनशीलतेची साक्ष देते.

डॉ निर्मलकुमार फडकुले हे तर महाराष्ट्रात उत्तम वक्ते, विचारवंत, समीक्षक आणि लेखक म्हणून ख्यातनाम आहेत संत साहित्याचा आधुनिक जीवनाशी सांधा जुळवीत त्यांनी निरनिराळ्या पद्धतीने हा विचार मराठी माणसांसमोर आणला आहे. त्यांची शब्दप्रभु म्हणून ख्याती होती त्यांनी अनेक विषयांवर हजारो व्याख्याने दिली आहेत. डॉ. फडकुले हे मराठी संत साहित्यातले विद्वान होते. त्यांचा जन्म सोलापूर येथे एका संस्कृत विद्वानाच्या (न्यायतीर्थ, पंडित जिनदासशास्त्री फडकुले यांच्या) घरी झाला.

त्याच्या लोकहितवादी: काल आणि कर्तृत्व ह्या संशोधन प्रबंधास डॉक्टरेट मिळाली होती. त्यांनी नांदेडमध्ये (इ.स.१९५४ ते५५ या काळात) व नंतर संगमेश्वर कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख म्हणून काम केले.ललित लेखन आणि संतसाहित्याच्या लेखनाबरोबरच त्यांची आस्वाद समीक्षा साहित्य जगतात कौतुकास पात्र ठरली होती. अमृतकण कोवळे,अश्रूंची कहाणी,आनंदाची डहाळी,कल्लोळ अमृताचे,काही रंग, काही रेषा, चिंतनाच्या वाटा,परिवर्तनाची चळवळ,प्रिय आणि अप्रिय,मन पाखरू पाखरू,संतकवी तुकाराम : एक चिंतन,संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना,संत तुकारामांचा जीवन विचार,संत वीणेचा झंकार,संत सहवास,संत साहित्य : सौंदर्य आणि सामर्थ्य, संतांचिया भेटी, साहित्यातील प्रकाशधारा,सुखाचा परिमळ,हिरव्या वाटा,चिपळूणकरांचे तीन निबंध डॉ.निर्मलकुमार फडकुले ह्यांची आंबेडकर, कवी कुंजविहारी, ना.सी. फडके, प्रल्हाद केशव अत्रे, महात्मा फुले, सावरकर ह्यांच्यावरील व्याख्याने प्रसिद्ध आहेत. पंढरपूरचे ग्रामीण कथाकार आणि समीक्षक प्रा डॉ. द. ता. भोसले यांचीही विपुल साहित्य संपदा आहे. सांगोला येथील डॉ कृष्णा इंगोले यांची सहित्य परंपरा मोठी आहे.

ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले द्यावीत, असे म्हणणारे कविवर्य दत्ता हलसगीकर यांनी गिरणीत काम करत असताना महाराष्ट्राला अनेक कविता दिल्या त्यांची काव्यसंग्रह आणि विविध विषयावर पुस्तक प्रसिद्ध आहेत, तसेच सोलापुरातले तेलुगू भाषिक कवी लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी मराठी कविता केल्या त्यांची कविता सहजता आणि अर्थघनता घेऊन येते, अनुवादित कथासंग्रह, साहित्य अकादमीने प्रकाशित केलेली 'एका पंडिताचे मृत्यूपत्र', ही कादंबरी हा त्यांचा ठळक लेखन ऐवज आहे. प्रा.चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांच्या 'आत्मे घ्या आत्मे' या संग्रहातील कवितांना वास्तवतेचा दाहक स्पर्ष आहे. कुर्डूवाडीचे प्रा.राजेंद्र दास हे आज वैचारिक आणि भावनिक पातळीवरून अर्थ सघन अशी कविता लिहितात कवितेचं प्रयोजन समजलेला कवी अशी त्यांची प्रतिमा काव्याच्या क्षेत्रात आहे.

ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी मानकरी द.रा. बेंद्रे हे सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात प्राध्यापक होते त्यांचे वाङ्मय त्यांच्या प्रगाढ व्यासंगाचे दर्शन घडवते, त्यांच्या लिखाणाला तत्व चिंतनाची डूब होती. त्यांच्या तीन कादंबऱ्यांना कर्नाटक साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. डॉ.य. दि. फडके, डॉ. भा. दि. फडके, प्रा.अ.दि.फडके, डॉ.यु.म. पठाण यांची नाळ सोलापूरशी जोडलेली आहे. डॉ. नरेंद्र कुंटे यांनीही संत वाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेला आहे. प्रा.निशिकांत ठकार यांनी काही साहित्यकृतीचा अनुवाद केला आहे त्याबद्दल त्यांना साहित्य अकादमीने अनुवादक म्हणून गौरविले आहे. डॉ गो.मा. पवार हे साक्षेपी समीक्षक तर आहेतच पण त्यांनी अखंड परिश्रमानंतर लिहिलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनावरील ग्रंथाने अनेक पुरस्कार मिळवले आहेत श्रीमती शशिकला साळगावकर ह्या कवयित्री म्हणून ख्यातनाम आहेतच पण त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहून एके काळी मराठी साहित्यसृष्टीत आपली वेगळी मुद्रा उमटवली आहे. डॉ.द्वारकानाथ कोटणीस हे तर




पद्माकर मा. कुलकर्णी
अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर.
९९२२४२४५३७

सोलापूरचे भूषण आहे.द मा मिरासदार यांचीही साहित्य परंपरा मोठी असून त्यांनी महाराष्ट्रात कथाकथनाचे खूप कार्यक्रम केले आहेत. वि आ बुवा हे सोलापूर जिल्ह्यातील असून त्यांनीही विनोदी लेखन मोठ्या प्रमाणात केले आहे. बार्शीचे व्यंगचित्रकार खलील खान यांनी आपल्या विनोदी शैलीतल्या चित्रांनी महाराष्ट्राला खळखळून हसवले, तर शिल्पकार भगवान रामपुरे यांनी आपली सर्व शिल्पे आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवली आहेत. चित्रकार अलमेलकर हे सोलापूरचेच, कवी दिवाकर दुनाखे यांनी परमार्थ बोध आणि श्रीरंगलीलामृत या ग्रंथांचे संपादन केले.तरल हळव्या स्वभावाच्या कवी दिवाकर दूनाखे यांचे गझलवंती आणि दि वाणा हे दोन काव्य ,गझल संग्रह प्रसिद्ध आहेत. तर वसुधा दुनाखे यांनी अनेक कथा, कविता,बाल साहित्य महाराष्ट्रातल्या अनेक नामांकित मासिकातून ,दैनिकातून लेखन केले आहे त्यांचा वसुधा गीत हा एक कविता संग्रह प्रसिद्ध झाला आहे. बार्शीचे प्रा.मिलिंद जोशी हे महाराष्ट्राला वक्ते म्हणून माहीत आहेतच परंतु त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत.



सोलापूरच्या साहित्य विश्वात स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर जी महत्वाची काही संमेलने झाली त्यात सोलापूरला १९४१ साली झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे २५ वे रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलन हे महत्त्वपूर्ण ठरले. या संमेलनाचे अध्यक्ष कादंबरीकार वि.स. खांडेकर होते हे संमेलन त्याकाळी सेवासदन प्रशाला आणि हायर प्रायमरी शाळेच्या मैदानावर भरले होते. त्यानंतर तब्बल ६५ वर्षांनी सोलापुरात सन २००६ ला ७९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवलं होते. त्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरण्यऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली होते. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. निसर्ग तज्ज्ञ बी.एस.कुलकर्णी, डॉ. अच्युत गोडबोले, डॉ. अरुण टिकेकर, प्रा.गजानन भिडे, डॉ.इरेश स्वामी, आनंद कुंभार, भाई पन्नालाल सुराणा.यांच्यासह अलीकडच्या काळात लेखिका विजया जहागीरदार यांचे बालसाहित्य मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाले असून त्या सोलापूर येथे झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या त्यांच्या स्त्री-नक्षत्र, रातवा, आदी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कवी हेमकिरण पत्की हे एक मनस्वी कवी असून त्यांची 'पाऊस फुले' आणि 'एकांत वाटेने' हे कवितासंग्रह चांगलेच गाजले. साहित्यिक, श्रीमती निर्मला ठोकळ यांनी तर प्रा.डॉ.सुहास पुजारी हे साहित्यात आणखीन काही उगवतीच्या नावापैकी एक नावं सोलापूरच्या मराठी साहित्याच्या क्षेत्रात सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. सोलापूरचे समकालीन कविवर्य नारायण कुलकर्णी यांनी स्फुट कविता बरोबरच ज्ञानेश्वरीचं सुबोध मराठीत लेखन




करून ओवीबद्ध प्रसाद ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला आहे. वास्तवाचे दर्शन घडवणारे त्यांचे मिस्कील 'दुभंग' ही त्यांची खासियत आहे. डॉ.शे.दे.पसारकर हे आणखीन एक अध्यात्माच्या विषयाला वाहिलेले लेखक आहेत त्यांनी ज्ञानेश्वरी व साक्षेपी लेखन केलेले आहे.वीरशैव साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी यापूर्वी भूषवले आहे. सुरेखा शहा त्यांच्या जोहड या कादंबरीमुळे महाराष्ट्रात प्रतिष्ठित लेखिका म्हणून ख्यातनाम झालेले आहेत पण कथा या प्रकारात त्या गेल्या तीस वर्षापासून सर्वांनाच परिचित आहेत. डॉ भगवानदास तिवारी या प्रकांड पंडिताने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधन केले, साहित्य महामहोपाध्याय, शिक्षा विशारद,आणि तत्वभूषण या पदव्यांनी ते सन्मानित झाले, त्यांनी पन्नास वर्षात हिंदीमध्ये चाळीस, मराठी मध्ये तीन, इंग्रजीत दोन, असे एकूण ४५ ग्रंथ लिहिले आहेत. प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनीही स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास हे पुस्तक लिहिले असून सोलापूरच्या मार्शल-लॉ वर त्यांचा दांडगा अभ्यास आहे. त्यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयावर व्याख्यानं दिली आहेत. कवी माधव पवार यांचा शुभशकुनाचे पक्षी हा काव्यसंग्रह चांगलाच गाजला त्यांच्या अनेक लावण्या सुरेखा पुणेकर यांनी गायल्या आहेत, कवी गिरीश दुनाखे यांनी आतापर्यंत अनेक दिवाळी अंकातून,आणि वर्तमानपत्रातून कथा,कविता आणि बालसाहित्य लेख प्रसिध्द झाले आहेत.सध्या त्यांचे स्फुट लेखन चालू आहे. साने गुरुजी कथामालेच्या माध्यमातून अवधूत म्हमाने यांनी बालसाहित्याची चळवळ उभी केली. त्यांची बाल सहित्यावर त्यांची अनेक पुस्तके प्रसिध्द आहेत. ग्रामीण कथाकार योगिराज वाघमारे, कवी वैभव जोशी, सायली जोशी, कवी मुबारक शेख, अंजुम मोमीन, डॉ अजीज नदाफ, कवी मारुती कटकधोंड, राजेंद्र भोसले, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, मोडनिंबचे कवी सुरेशकुमार लोंढे, दत्ता गोसावी, पुरुषोत्तम नगरकर, डॉ.नसीमा पठाण, गंगाधर वाघमोडे, भरतकुमार मोरे, राजेंद्र भोसले, मंजिरी सरदेशमुख, डॉ.श्रुती वडगबाळकर, निर्मला मठपती, व्यंकटेश कामतकर, सिंधुताई कुलकर्णी, रेणुका बुधाराम, वंदना कुलकर्णी, डॉ स्मिता पाटील, बार्शीचे मुकुंदराज कुलकर्णी, श्रीकांत मोरे, देवेंद्र औटी, प्रमोद लांडगे, डॉ महादेव देशमुख ,डॉ शिवाजीराव देशमुख, बाबुराव मैंदरगीकर, लता अध्यापक, शिवाजी सातपुते, श्याम सावजी, बार्शीचे सुरेश पाठक, प्रकाश गव्हाणे, जेऊरचे नागराज मंजुळे, पंढरपूरचे संभाजी अडगळे, सुनील जवंजाळ, सूर्याजी भोसले, वैशाली अघोर, रामकृष्ण अघोर, सुनेत्रा पंडित, शांताबाई क्षीरसागर, शोभना सागर, चंद्रकांत झुंजे, डॉ. शिवाजीराव देशमुख, सुनील शिनखेडे, स्नेहा शिनखेडे, ना.मा.कांबळे, अनंत वेणेगुरकर, नागेश सुरवसे, डॉ. अपर्णा कल्याणी, शशिकांत जोशी, सौ.दुर्गा जोशी, डॉ. शिवकन्या कोंजारी, पिंपळ खुंटेचे कवी नारायण सुमंत, डॉ.ऋचा कांबळे, गोविंद काळे, ल.सि.जाधव, भ.वा. अघोर, शंकरराव पटवर्धन, रजनी थिगळे, रा.श्री.पंचवाघ, नितीन वैद्य, बदिउज्जमा बिराजदार, पंडित गुलामदस्त गीर बिराजदार, सुषमा देशपांडे, प्रभावती कुलकर्णी, योगीराज वाघमारे, सुषमा हिरेकेरुर, शाहीर विश्वासराव फाटे, डॉ. रा. ल.जोशी. डॉ.राजा ढेपे, आपल्या वक्तृत्वाने पुरळ पाडणारे प्रा लक्ष्मणराव ढोबळे, मंगळवेढ्याचे प्राचार्य सुरेश शिंदे, प्रा. प्रकाश जडे, कवी शिवाजी सातपुते, इंद्रजीत घुले सांगोल्याचे प्राचार्य प्रबुद्ध चंद्र झपके, प्रा. धनाजी चव्हाण, आशा पाटील, रामचंद्र धर्मसाले, जोतिराम फडतरे, अक्कलकोटच्या शैलशिल्पा जाधव अशा अनेक कवींची सोलापुरसह जिल्ह्यात काव्यांची चांगली परंपरा आहे, कविराय राम जोशी यांच्यापासून या परंपरेचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की सोलापूर नगरीने मराठी सारस्वताला एका पेक्षा एक असे दर्जेदार कवी आणि साहित्यिक दिले आहेत, शहरातून काव्याच्या अनेक मैफिली नेहमीच होत असतात. त्यामुळे काव्य निर्मितीला सोलापूर शहरासह ग्रामीण भागात अजूनही अनुकूल वातावरण आहे. अजूनही जिल्ह्यात खूप कवी आणि साहित्यिक परंतु मला फारशी नावं लक्षात नाहीत, अनेक ताज्या दमाचे नवकवी या सोलापूरची कीर्ती बुलंद करीत आहेत. सोलापुरात पूर्वी साहित्यिक वातावरण मोठ्या प्रमाणात असले तरी साहित्य संस्था एकच होती. कलांतराने ज्यांनी गेली ४२ वर्ष साहित्याची सेवा केली, असे साहित्य सेवक पद्माकर कुलकर्णी यांनी सोलापूर शहरासह जिल्ह्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १८ शाखा उभ्या केल्या. त्यामुळे सोलापूर शहरासह जिल्ह्यामध्ये नवकवी आणि नवोदित साहित्यिक निर्माण झाले आहेत. त्यांचा अध्याप मला परिचय झाला नाही त्यामुळे विविध साहित्याच्या कार्यक्रमातून विभागीय आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून सोलापूरच्या कवी आणि लेखकांनी बाजी मारली आहे.

## संगीत,नाटक आणि सांस्कृतिक वारसा

**सोलापूरचा सांस्कृतिक विश्व विशेष उल्लेखनीय असाच आहे साहित्यकांची एक्सकास परंपरा या शहराला लाभलेल्या हे काव्य कथा कादंबर्या आणि नाट्य कृतींची मनस्वी निर्मिती या भूमीमध्ये अखंड चालू आहे नाटक हा साहित्यप्रकाराचा एक विशेष घटक असून सोलापूरच्या नाटककाराने रंगभूमीसाठी विशेष असा मौलिक योगदान दिले आहे अनेक नाटककाराने सोलापुरात नाटकांची एक यशस्वी परंपरा निर्माण केली आहे ती प्रामुख्याने हौशी रंगभूमीसाठी.**

सोलापूरकरांनी साहित्यावर प्रेम केलं तसंच नाटक आणि सांस्कृतिक जीवनावरही प्रेम केलं आहे सोलापूरच्या मातीमध्ये अनेक नाट्य कलाकार, सिनेकलाकार होऊन गेले, सोलापूरच्या रंगभूमीची विविधता अनेक प्रवृत्ती आणि प्रवाह यामधून पहावयास मिळतो संगीत, कामगार , प्रायोगिक, लोक , विद्रोही, दलित, बाल, एकपात्री,आणि पंचवाषिक अशा अनेक प्रवाहांचा संक्षिप्त आढावा त्यावेळी रंगकर्मींनी घेतला आहे. अशा पडद्या मागच्या कलावंतांना ही विसरून चालणार नाही. सोलापुरी नाटककारांचा हा इतिहास सुमारे सहा दशकांचा आहे या साठ वर्षात दोन कालखंड येतात, नाट्य, चित्रपट, सृष्टी आणि राजकारण या क्षेत्रात उगवत्या सूर्याला सलाम केला जातो पण गेली ४५ वर्ष मराठी नाट्यसृष्टीत स्वकर्तृत्वाने लखलखणारी एक तारका म्हणजे कलावती फैय्याज यांचं नाट्यक्षेत्रातील कर्तुत्व फार मोठं आहे. हे सोलापूरकर विसरू शकत नाहीत, सारंगमामा कुलकर्णी डॉ.जब्बार पटेल, भारताचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, अभिनेत्री शशिकला साळगावकर, सरला येवलेकर,अभिनेता अतुल कुलकर्णी, पद्माकर देव, विद्या काळे, गुरुराज अवधानी, पांडुरंग काळे, शिरीष देखणे, शरदकुमार एकबोटे, लक्ष्मण काटे, मोहम्मद इसहाक मणियार, राजा सलगर, अभिनेता अतुल जोशी, शशिकांत लावणीस, सुशीला व्हनसाळे, कमलप्रभा हावळे, किशोर महाबोले, अक्षत कोठारी, अश्विनी तडवळकर, अमीर तडवळकर, प्रकाश यलगुलवार, वनमाला किणीकर, राजा सलगरकर, लक्ष्मीनारायण बोल्ली आणी शोभा बोल्ली, रजनीश जोशी, मीरा शेंडगे, जयप्रकाश कुलकर्णी, अशोक किल्लेदार, कमल ढसाळ, आनंद खरबस, साहिर नदाफ, अनुजा मोडक, गुरू वठारे, लक्ष्मण उपरे, राजू मोडक, सुनील गुरव, सुमित फुलमामडी, अपर्णा जोशी, अमोल धाबळे, रेवण शाबादे, प्रा.अजय दासरी, आशुतोष नाटकर, मोहन आंग्रे, विजय साळुंके, लक्ष्मीनारायण आकेन, अमोल देशमुख, डॉ विलास सलगरकर, नागेश कन्ना, यतीराज वाकळे, पं.ना.कुलकर्णी, विठ्ठल अवशेट्टी, वसंत एकबोटे, संजीवनी काळे, मंदार काळे, अपर्णा रामतीर्थकर, सुहास वर्तक, नंदलाल भैया, चंदुलाल श्रावण, बंडेश पांढरे, रवी मालपुरी, शशिकांत बटाने, उमेश बटाने, डॉ. राजीव मोहोळकर, रामप्रसाद दुबे, राजा राजेशचंद्र, किर्तीपाल गायकवाड, विजयालक्ष्मी कोकणे, अशा अनेक कलावंतांनी विविध नाटकातून चित्रपटातून आपल्या भूमिका पार पाडल्या आहेत तर काहींनी टीव्ही मालिका मधून काम केले आहे. तर दीपक देशपांडे यांनी आपल्या हास्य जत्रेतून महाराष्ट्रात हास्यसम्राट किताब मिळवला. सोलापूरच्या नाट्यलेखनाचा आलेख हा असा चढता आहे केवळ नाट्य लेखनाची परंपराच या प्रतिभावंतांनी जपली आहे. असे नाही तर सोलापूरच्या उज्ज्वल साहित्य परंपरेत मानाचा तुरा खोवला आहे.आणि महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेत मोलाची भर टाकली आहे. असंच मला म्हणावे लागेल. संगीत क्षेत्रात प्रभुदेव सरदार, श्रीराम पुजारी, सुलभा पिशवीकर, डॉ अश्विनी वळसंगकर, डॉ.सुलभा ठकार,भालचंद्र पंचवाडकर, गिरीश पंचवाडकर, नानासाहेब चक्रदेव, प्रशांत देशपांडे, अतुल बेले, सुरेखा गणपुले, रागिणी म्हैसकर, श्रीकृष्ण खाडिलकर, डॉ माधवी रायते, डॉ वासुदेव रायते, गोविंद दाते, वायजे कुलकर्णी, मनीषा जोशी, ममता बोल्ली, ऋषिकेश पागे, डॉ संध्या जोशी, मोहम्मद आयाज, अशा सर्व कलावंतांनी मराठी रंगभूमी हा महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय ठरवला या सर्वांचा रंगभूमीवरील संगीताचा, नाटकाचा, संगीत नाटकाचा, शास्त्रीय संगीताचा, नृत्याचा, विनोदाच्या क्षेत्रात सिंहाचा वाटा आहे. मराठी रंगभूमी गाजवली आणि गाजते आहे. ती प्रामुख्याने या संगीत क्षेत्रातल्या सर्व मान्यवरांमुळेच, चित्रकलेच्या आणि पोस्टरच्या माध्यमातून बार्शीच्या खलिल- खान आणि सोलापूरच्या यल्लादासी आणि आलमेलकर यांनीही महाराष्ट्रात आपलं नाव मोठं करून ठेवलं आहे. शिल्पकार भगवान रामपुरे यांचा जन्म सोलापूर येथे एका गरीब कुटुंबात त्यांनी अनेक शिल्प आंतरराष्ट्रीय हॅपीचे शिल्प तयार करून सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे काम रामपुरे यांनी केला आहे त्यांनी अनेक महत्त्वाच्या तसेच अनेक महाराजांचे पुतळे तयार करून दिले आहेत नुकतेच त्यांनी आदि शंकराचार्यांचे १०८ फुटी पुतळा मध्ये प्रदेशातील भोपाळ जवळ असलेल्या ओंकारेश्वर डोंगरावर उभा करून आंतरराष्ट्रीय पातळीवर रामपुरे यांनी सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले आहे. सोलापुरातल्या अशा अनेक कलावंतांनी आपआपल्या क्षेत्रात ठसा उमटवला आहे. हे लेखन करत असताना अनेक कलावंतांची नावे राहिले असतील कदाचित ती मला माहीतही नसतील परंतु ज्यांची नावे राहिली आहेत त्या सर्वांना गृहीत धरून हा लेखन प्रपंच केला आहे.आपल्या सर्वांना शुभेच्छा !!




## आठवणीतले माहेरगांव




## सोलापूर त्याचे नांव

**जन्मगांव, शिक्षणगांव, सासरगांव, कर्मभूमीगांव सारं काही फक्त सोलापूर. आठवायला काही विसरलेच नाही. ती वाडा संस्कृती, चाळ संस्कृती नाही विसरता येत. कट्यावरच्या पा-यावरच्या गांव गप्पा आठवतात अजूनही.छोटे छोटे गल्लीबोळ कुठेही जावा खेळा बागडा कसली कुठली भीती नाही. मुळात घाबरायचे माहीतच नाही ना. लपंडाव, पळापळी, सायकल शिकणे एवढ्याच गोष्टी करायच्या. आजूबाजूच्या पाच सहा गल्ली मधून. आणि त्यालाच सोलापूर समजायचे. हुतात्मा बाग, जलतरण तलाव, सिद्धेश्वर मंदिर, सिद्धेश्वर तलाव, गणपती घाट याठिकाणी सुट्टीत जायला मिळायचे एवढेच.**

जसजसा वाढला बुद्धीचा आवाका, मित्र-मैत्रिणींचा घोळका तसतसा सुरू झाला सोलापूर परिसराचा अभ्यास करायला. घरच्यांचे बंधन असले तरी मनाचे अबंधनच होते. यातून सुरू केले एकमेकांच्या साक्षीने, मदतीने सोलापूरचे तीर्थाटन, पर्यटन, माहितीचे निर्देशन, भौगोलिक मार्गदर्शन, ऐतिहासिक प्रदर्शन एक ना अनेक गोष्टींमध्ये सतत गुंतुन राहणं. यात सोलापूर बहुभाषिक शहर. त्यामुळे कन्नड, तेलगू, हिंदी, गुजराती, मारवाडी, राजस्थानी,उर्दू या सर्वांची सरमिसळ करून मराठीत बोलायचे. आणि वर कळलं का बे? म्हणून विचारायचं.

पुढे बंधनाची एक काळी पोत बांधली गेली आणि मर्यादेच्या बंधनांना स्वीकारावे लागले. पण सासर इथलेच. म्हणून सोलापूरची बांधीलकी बांधून राहिली. मग तेच रस्ते, त्याच पेठा, तेच गल्लीबोळ मनात अभिमानाने वसु लागले. कारण ते आता माहेरचे होते ना.

असे सोलापूर कसे होते आणि आहे. गिरणगाव म्हणून प्रसिद्ध असलेले सोलापूर हुतात्म्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. सिद्धेश्वर मंदिर ग्रामदैवत तरी आजूबाजूला अनेक तीर्थक्षेत्रांची काशी असलेले. ऐतिहासिक वारसा लाभलेले, सांस्कृतिक मंचाने सजलेले, अध्यात्माच्या श्रद्धेने भारलेले सोलापूर, आरोग्याचे स्पेशॅलिस्ट हब ही आहे. इथे मोठमोठी सुपर स्पेशॅलिटी रुग्णालये उभारली गेली आहेत.तर दुसरीकडे औषधविना उपचारासाठी योगतज्ञ, प्राणायाम ओंकार तज्ञ, क्युप्रेशर क्यपंक्चर तज्ञ, निसर्गोपचार तज्ञ यांची संख्या वाढत आहे.विशेष म्हणजे यातही यशस्वीतेची ग्वाही आणि भरारी दिसत आहे.




सोलापुरी चादर,सोलापुरी शेंगा चटणी यासाठी जगभरात प्रसिद्ध असलेले सोलापूर ज्वारीचे कोठार म्हणूनही नावाजलेले आहे.

अनेक कलागुणांचे कलावंत, ज्ञानवंत, विचारवंत यांचे जन्मगांव असलेले सोलापूर संतभूमी म्हणूनही वंदनीय आहे. इथे अनेक शैक्षणिक संस्था, उद्योग व्यवसाय यांनी जगभरात गरुड भरारी घेतली आहे. तर छोटे व्यवसायिक कामगार यांचे यश नेहमी प्रगतीपथावर असते.

राष्ट्रीय संरक्षित वास्तू म्हणून घोषित केलेला सोलापूरचा भुईकोट किल्ला.तो आज खूप सुंदर वृक्षवेली झाडाझुडपांनी सजलेला किल्ल्यातील बगीचा झाला आहे. त्याचप्रमाणे स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ट नमुना असलेली अतिशय सुंदर देखणी भव्य इमारत सोलापूरात दिमाखात उभी आहे. तिथे आता सोलापूर महानगरपालिकेचे कामकाज चालते. ती इमारत इंद्रभुवन नावाने ओळखली जाते. सोलापूर एकमेव शहर आहे ज्यांनी स्वातंत्र्यापूर्वीच तीन दिवस स्वातंत्र्य उपभोगले आहे.

इथे अनेक स्वातंत्र्य सेनानी होऊन गेले. आता स्मार्ट सिटी योजनेमुळे सोलापूरचे स्मार्ट सिटी मध्ये परिवर्तन होत आहे. पुणे मुंबई सारख्या इमारती अपार्टमेंट इथे ही होत आहेत. पूर्वी वाडा आणि चाळीतील आपुलकीचे सहकार्याचे दरवाजे कायम उघडे असायचे. आता अपार्टमेंटच्या लिफ्ट मधील क्लोज द् डोअर या वाक्याने सर्वांच्या मनाचे दरवाजे हळूहळू बंद होत आहेत. एवढी खंत मात्र या माहेरच्या गावातही वाटत आहे. तसेच सोलापूरची ओळख सिनीयर सिटीझन गांव म्हणूनही होत आहे. एकाकीपणा भरून राहतोय असं वाटतं राहतं. तरीसुध्दा दुसरीकडे साहित्य आणि साहित्यिक यांच्यामुळे, सांस्कृतिक कलागुण आणि कलावंत यांच्यामुळे सोलापूरची आनबानशान वाढतच आहे.खरंतर सोलापूरात मल्टीप्लेक्स संस्कृती भागवत थेटरच्या रूपात पूर्वीपासून होतीच.आता त्यातही सुधारणा झाली आहे. नवीन नाट्यगृह सभागृह झाली आहेत. तेथील व्यासपीठावर रंगमंचावर सतत एक आनंदाची उमेदीची उत्तुंग भरारीची झेप घेण्याची जिद्द आणि लगबग सुरू असते. वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक कलाकार इथल्या मातीशी नाळ जोडलेले आहेत. यांच्यामुळेच सोलापूरचे नांव जगाच्या नकाशावर कोरलेले आहे.

अहिल्याबाई होळकर विद्यापीठाची स्थापना सोलापूरातील यशाचा,विकासाचा मापदंड ठरला.यामुळे अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक साहित्यिक आरोग्याचे क्षेत्र विकसित होत आहे. आर्थिकदृष्ट्या जास्त सक्षम बनत आहे सोलापूर आणि सोलापूरची ओळख. इथे जसा निवांत आहे म्हणणारा वर्ग आहे तसाच सतत विकास करण्यासाठी धडपडणारा वर्ग आहे. दोघेही आपापल्या कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत. अशा नवीनतम आविष्कारांचा गाभा घेऊन विकासित होत आहे माझे सोलापूर.




संगीता एखंडे

सोलापूर

९४२३५८८३६८


## सोलापूरची खाद्यसंस्कृती

**चवीचे खाणार त्याला सोलापुरात सर्वकाही मिळणार असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. किती विविध पदार्थ सोलापुरात मिळतात नुसती उजळणी जरी केली तरी तोंडाला पाणी सुटेल. मी मुळचा सोलापूरचा नाही पण मागील २० -२५ वर्षांपासून सोलापुरात राहतो आहे व आजपर्यंत जे काही घरचे सोडून सोलापुरात बाहेर खाल्ले आहे त्याच्या अनुभवावरून हे लिहले आहे.**



एखादे सोलापुरात ठिकाण किंवा पदार्थ असेल तो मी चाखला नसेल तर त्याचा उल्लेख येथे आलेला नाही. तेव्हा कृपया कोणताही गैरसमज नको. 'डिस्को भजी' हा भज्याचा प्रकार सोलापुरातच मी पहिल्यांदा खाल्ला. केलेली मिर्ची भजी कापून पुन्हा एकदा तेलात तळून कडक केली जातात. त्यासोबत शेंगा चटणी आणि कढी व बारीक कांदा दिला जातो हे सर्व एकदम अप्रतिम. बहुतेक सर्व भज्यांच्या गाड्यावर हा डिस्को भजी प्रकार मिळतोच. सोलापूरची शेंगाची चटणी आणि कडक भाकरी ही फक्त सोलापुरात नव्हे तर राज्यभर प्रसिद्ध आहे. परदेशातही ही निर्यात केली जाते. सोलापूरचे 'नसले बंधू' यासाठी प्रसिद्ध आहेत. काही बचत गटा मार्फत देखील कडक भाकरी बनवली जाते. यातून महिलांना मोठा रोजगार मिळाला आहे. भेळेसाठी 'भैय्याची भेळ' ही प्रसिद्ध आहे. क्वचित असा सोलापूरकर असेल ज्याने भैय्याची भेळ ही खाल्ली नाही. पार्कवरील विविध गाड्या विविध पदार्थ सोलापूरकरांना खावू घालत असतात. ही सोलापूरची मुंबईची चौपाटीच जणू आहे. नवीपेठेत संध्याकाळी खरेदीला गेल्यानंतर किंवा इतर काही कामानिमित्त गावात गेल्यानंतर सोलापूरकर या पार्कवरील गाड्यावरील पदार्थांचा आस्वाद सहकुटूंब घेतात. संध्याकाळी येथे तुडूंब गर्दी पहावयास मिळते. वजनावर आईस्क्रीम देखील मी सोलापुरात पहिल्यादांच खाल्ले आहे. याची चव देखील मस्त.

जोशींचा भाग्यश्री चिवडा आणि बटाटेवडा हा देखील सोलापुरात खूप प्रसिद्ध आहे. या दोन्हीची चव लाजवाब. दरवर्षी भरणाऱ्या गड्डा यात्रेत यांचा स्टॉल असतो. गड्डा यात्रेत गेलोत आणि जोशींचा गरम असा बटाटेवडा खाल्ला नाही असे होत नाही. सकाळच्या नाष्टासाठी सोलापुरात अनेक ठिकाणे आहेत. माझ्या आवडीचे ठिकाण म्हणजे सुधा . येथील इडली वडा , डोसा व अमर्याद मिळणारी चटणी व सांबार एकदम मस्त. सध्या यांची दोन ठिकाणे झाली आहेत. एक जुळे सोलापुरात आणि दुसरे सात रस्ता . दोन्ही ठिकाणी ग्राहकांची वर्दळ तुडूंब. रविवारचा कित्येक घरांचा नाष्टा येथेच होतो. घरी देखील पॅकबंद करून येथून पदार्थ दिले जातात. कोणत्याही वेळेचा नाष्टा साठी कामत हॉटेल देखील खूप चांगले आहे. इथला पेपर डोसा मस्त. मी जुळे सोलापुरात राहत असल्याने येथीलच नाष्टासाठी पुष्पक, स्वाद देखील उत्तम ठिकाणे आहेत. पावभाजीसाठी सोलापुरात सुप्रजा प्रसिद्ध आहे. बहुतेक सोलापूरकरांनी येथील पावभाजी खाल्ली असेलच. उन्हाळ्यात किंवा इतरवेळी देखील कामठे पुणेकर येथील उसाचा रस प्रसिद्ध. तसेच सात रस्ता मधील कृष्णा आईस्क्रीम देखील मस्त.

अनादीची धपाटे, शेंगा पोळी, खवा पोळी अप्रतिम. घरी पार्सल सेवा देऊन अनेक सोलापूरकरांची मने व पोट यांनी तृप्त केली आहेत. आज सोलापुरातील काही महिला देखील गृह उद्योग करून काही घरगुती पदार्थ जसे कि विविध प्रकारचे लाडू , चकली , सातूचे पीठ , चिवडा, शेव , दिवाळीचे पदार्थ सोलापूरकरांना पुरवत आहेत. यांनी बनवलेले पदार्थ देखील चवीला उत्तम असतात. सोलापुरातील हॉटेल मधील देखील जेवण अगदी चविष्ट. यात गुजराथी थाळी पुरवणारे रसिक, साईप्रसाद, पांचाली , पूनम इत्यादी हॉटेल खरं बेस्टच आहेत. इतर हॉटेल म्हणजे लोकप्रिया, अंबर, सेलीब्रेशन, कामत , जय- विजय, निसर्ग , मंत्रालय , धनश्री , बासुरी इत्यादी हॉटेल मधील जेवण पोटाला तृप्त करणारे आहे. हुग्गी (गव्हाची खीर ) देखील काही हॉटेलमध्ये किंवा गाड्यावर मिळते असे मी ऐकले आहे. पण अजून तो माझा आवडता पदार्थ असून देखील बाहेर मी तो चाखलेला नाही बघूया कधी योग येतो ते. कार्यक्रमातील केटरिंगचे पदार्थ प्रीती आणि दिपालीचे उत्तमच . वर्षानुवर्षे यांनी तीच अवीट चव ठेवून सोलापूरकरांची मने जिंकलेली आहेत. घरगुती जेवणासाठी 'हॉटेल सुगरण' खरं सुगरणच. मिठाई व इतर खमंग पदार्थांसाठी 'अन्नपूर्णा' उत्तम. घरगुती जेवणातील पदार्थ जसे की विविध चटण्या , लोणचे , पापड , मिरच्या यासाठी 'पेठे' यांचा हात कोणी दुसरा धरू शकणार नाही.

तेव्हा या लेखावरून वाचकांना हे लक्षात आले असेल कि सोलापुरात खाण्याची रेलचेल आहे. सोलापूरकर तर याचा आस्वाद बारा महिने घेतातच. सोलापुरात कामानिमित्त, पर्यटनानिमित्त आलेल्या बाहेरील पाहुण्यांना या सोलापूरची खाद्यसंस्कृती सांभाळणाऱ्या व्यावसायिकांनी चांगला पाहुणचार व चविष्ट पदार्थ खाऊ घालून सोलापूरचा बहुमान वाढवला आहे. तेव्हा आमच्या या लाडक्या सोलापुरात सर्व खवैयांचे हार्दिक स्वागत आहे. धन्यवाद !




महेश रायखेलकर

सोलापूर

९३२६६१२४३६


## एकमेव विद्यापीठाची दमदार वाटचाल!

### महाराष्ट्रासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ठरतोय रोल मॉडेल!




**२१ वर्षांपूर्वी संपूर्ण देशात केवळ एका जिल्ह्यासाठी सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. अशा या एकमेव विद्यापीठाने गेल्या दोन दशकात सोलापूर जिल्ह्यातील उच्च शिक्षणामध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. अशा एकमेव विद्यापीठाची दमदार वाटचाल सुरू असून सोलापूर शहर व जिल्ह्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ताभिमुख व रोजगाराभिमुख उच्च शिक्षण देऊन त्यांच्यात कौशल्य निर्माण करून रोजगाराभिमुख पिढी निर्माण करण्याचा ध्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने घेतलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रासाठी सोलापूर विद्यापीठ रोल मॉडेल ठरत आहे.**



सोलापूर विद्यापीठ स्थापनेपूर्वी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे पदव्युत्तर केंद्र सोलापुरात अस्तित्वात होते. महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि. २२ जुलै २००४ नुसार सोलापूर विद्यापीठ स्थापन झाले. दि. ५ मार्च २०१९ रोजी या विद्यापीठाचा नाम विस्तार होऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ असे नामाविस्तार राज्य शासनाने केले. २१ वर्षे पूर्ण करून २२व्या वर्षाकडे वाटचाल करत असलेल्या या विद्यापीठाने सोलापूर जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती करून उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई, गुलबर्गा, विजापूर आदी परजिल्ह्यात व परराज्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबवले. 'विद्यया संपन्नता' हे ब्रीदवाक्य अंगीकारलेल्या या विद्यापीठाने गुणवत्ताभिमुख शिक्षणाची सोय करण्याबरोबरच रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून कौशल्याभिमुख व उद्योगाभिमुख पिढी घडवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. निश्चितच सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात समृद्ध विकास यामुळे होताना दिसून येत आहे.

२००४मध्ये सोलापूरचे सुपुत्र असलेले महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मोठ्या प्रयत्नाने केवळ एका जिल्ह्यासाठी सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. आज या विद्यापीठाने चांगली प्रगती करून देशातील विद्यापीठांसाठी रोल मॉडेल विद्यापीठ ठरले आहे. आजपर्यंत या विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची धुरा अनुक्रमे डॉ. इरेश स्वामी, डॉ. बाबासाहेब बंडगर, डॉ. एन. एन. मालदार, डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी सांभाळली. आता मागील दीड वर्षापासून म्हणजे दि. ६ नोव्हेंबर २०२३ रोजी पासून कुलगुरूपदाची सूत्रे प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी स्वीकारली आहेत. कुलगुरू डॉ. महानवर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा विकास करताना जागतिक पातळीवर आपली कीर्ती झाली पाहिजे, असा मानस व्यक्त करून त्या दृष्टीने त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली. नॅकची ग्रेड वाढवून विद्यापीठाची गुणवत्ता सिद्ध झाली पाहिजे आणि येथील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, या दृष्टीने विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे.




राहुल वंजारे

विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी

९३२५० ५०१२३


विद्यापीठाची नूतन प्रशासकीय इमारत आणि परीक्षा भवनची आलिशान अशी देखणी इमारत नवीन कॅम्पसमध्ये तयार झाली आहे. उद्घाटनाचा सोहळा येत्या काळात होण्याची शक्यता आहे. याचबरोबर सोलापूर विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिल्यानंतर राज्य शासन आणि विद्यापीठ प्रशासन यांच्याकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा भव्य पुतळा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसमध्ये उभारण्याचा निर्णय घेऊन त्यादृष्टीने वेगाने पावले उचलली आहेत. पदमश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांच्याकडून अहिल्यादेवींचा पुतळा तयार केला आहे. स्मारक देखील विद्यापीठाच्या नूतन कॅम्पसमध्ये उभारले आहे. अतिशय उंच आणि भव्य-दिव्य ब्रांझमधील १४ फुटी पुतळा उभारला आहे. राज्य शासनाकडून साडे चौदा कोटींचा निधी त्यासाठी मंजूर झालेला आहे.

त्याचबरोबर सोलापूर विद्यापीठ कॅम्पसमध्ये सुरुवातीला पाच संकुले आणि काही विभाग सुरू होते. आता यामध्ये वाढ होऊन ११ संकुले व ३६ विभाग आणि ५४ कोर्सेस झाली आहेत. विद्यार्थ्यांची संख्या दुपटीने वाढ झाली आहे. सुमारे दोन हजार पाचशे विद्यार्थी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये शिक्षण घेत आहेत. मुलींची संख्यादेखील लक्षणीय आहे. सुसज्ज ग्रंथालय, वसतिगृह, जागतिक दर्जाची क्रीडांगणे, स्मार्ट रूम्स यामुळे दरवर्षी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या विद्यापीठात रांगा लागलेल्या दिसून येतात. शेजारील उस्मानाबाद, सांगली, सातारा या जिल्ह्यातील विद्यार्थी देखील सोलापूर विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शिक्षण घेतात. विद्यापीठातील कौशल्य विभाग केंद्राच्या वतीने खूप मोठे कार्य हाती घेऊन १४३हून अधिक कौशल्य विकासाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये महत्त्वाचे कोर्सेस सुरू करून तरुण पिढीला सक्षम बनण्याचे कार्य केले जात आहे. गेल्या तीन वर्षात सहा हजार विद्यार्थी विविध कौशल्य विकासाच्या कोर्सेसना प्रवेश घेऊन प्रशिक्षित झाले आहेत. यामधील ९०% विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार प्राप्त झालेला आहे. विशेषतः वैद्यकीय स्किल कोर्सेसचा आकडा १००% पर्यंत गेलेला आहे. याचबरोबर विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरचे कार्य अतिशय वेगाने सुरू असून उद्योजक पिढी घडवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून होत आहे. आज सोलापूर विद्यापीठाने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. या माध्यमातून शिक्षणाचे आदान-प्रदान व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

परदेशातील काही विद्यापीठांशी देखील आपल्या विद्यापीठाने करार केले आहे. यामध्ये फिनलँड आणि माल्टा येथील विद्यापीठाचा समावेश आहे. याचबरोबर प्रगत राष्ट्रातील युनियन ऑफ ऑक्सफर्ड या विद्यापीठीय संघटनेने आपल्या विद्यापीठाचे कौतुक करीत जागतिक समीट परिषदेसाठी निमंत्रित केले होते. त्यामध्ये आपल्या विद्यापीठाचे सादरीकरण करण्यात आले. जागतिक पातळीवर देखील आपल्या विद्यापीठाचे या माध्यमातून नाव झाले. नॅक पुनर्मुल्यांकनात ३४ गुण वाढून २.९६ सह बी प्लस प्लसचा दर्जा सोलापूर विद्यापीठाने प्राप्त केला. कोविड काळात देखील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन परीक्षा घेण्यात शंभर टक्के यशस्वी झाले. एकूणच सोलापूर विद्यापीठाने अल्प कालावधीत चांगली प्रगती केल्याचे अनेक शिक्षण तज्ञांनी म्हटले आहे.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कॅम्पस मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या कॅम्पस मुलाखतीसाठी देखील विविध उपक्रम राबवले जातात. याकरिता अनेक कंपन्याशी सामंजस्य करार विद्यापीठाने केलेला आहे. त्याचबरोबर विद्यापीठात विविध विभागात शिक्षण घेणाऱ्या जवळपास सर्व अभ्यासक्रमांसाठी देखील शिष्यवृत्ती देखील राज्य शासनाकडून प्राप्त होते. त्यामुळे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्याकरिता विद्यार्थ्यांना चांगला फायदा होतो.

### ठळक:-

- विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये-११५
- विद्यापीठांतर्गत एकूण विद्यार्थ्यांची संख्या- सुमारे ७५ हजार
- विद्यापीठ कॅम्पस विद्यार्थी संख्या मागील वर्षी-२५३७
- सध्या विद्यापीठात ११ संकुले, ३६ विभाग, ५४ अभ्यासक्रम
- मुलांच्या वसतीगृहाची क्षमता ७५ विद्यार्थी
- स्किल कोर्सेसची संख्या-१४५




दै.तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्य दिन - एकता उत्सव २०२५

सद्भावना वंदे मातरम् मंडळद्वारा

**सद्भावना तिरंगा वस्तू व तिरंगा मिठाई केंद्र**

१३ ते १५ ऑगस्ट २०२५

- स्थळ -

तिरंगा बंगला, पोलीस कल्याण केंद्रामागे,
देशप्रेमाच्या आकर्षक वस्तुंचे तिरंगा केंद्र व केंद्रावरच बनविलेले केशर लाडू, तिरंगा बर्फी, शंकरपाळी, मसाला शेव, दाळ यांचे मिठाई केंद्र

---

दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**चॅलेंजर स्पोर्ट्स् फाउंडेशन**

अध्यक्ष अतिश शहा
सचिव चंद्रशेखर गायकवाड

७८ किमी ऐतिहासिक अल्ट्रा रन १४ ऑगस्टला

नोंदणीसाठी संपर्क मो. ९१७५८२८२०३ / ७३५०५१३१९७

---

दैनिक तरुण भारतचा वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

**जेपीएस केमिकल्स प्रा. लि.**

मॅन्युफॅक्चरर ॲन्ड सप्लायर : लॅब केमिकल्स, ग्लास वेअर, इन्स्ट्रूमेंट, इंडस्ट्रिअल केमिकल्स, वॉटर ट्रिटमेंट केमिकल्स.

ग्रासिम इंडस्ट्रीजचे महाराष्ट्र आणि गोवाचे अधिकृत वितरक : कॉस्टिक सोडा, फॉस्फोरिक ॲसिड, ब्लिचिंग पावडर, पीएसी पावडर

- मुख्य कार्यालय -
२/१०, शिवाजी नगर, सात रस्ता, सोलापूर.

- शाखा कार्यालय -
शॉप नं. ६, आर्यक रेसिडन्सी, शिवणे पुणे
**युनिट :** प्लॉट नं. ए-८३, एम.आय.डी. सी. चिंचोळी, जि. सोलापूर - ४१३२५५
९७६५८६६३१९/७७४५०५४४४४
sales@jpschemicals.com
www.jpschemicals.com

---



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर संचलित

**ए.जी.कराटे क्लासेस**

जुळे सोलापूर.

प्रशिक्षणाची वेळ : वेळ ५ ते ८
संपर्क : मो.९७६४५९०८२५

ग्रँडमास्टर : युवराज गायकवाड
मुख्य प्रशिक्षक : अभिजीत गायकवाड
(राष्ट्रीय पंच, ब्लॅक बेल्ट, जिल्हाप्रमुख)

---

तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



- शुभेच्छुक -

खासदार धैर्यशील (भैय्यासाहेब) मोहिते पाटील
अध्यक्ष, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन

महेश (भैय्या) धाराशिवकर
अध्यक्ष, सोलापूर चेस अकॅडमी

सुमुख गायकवाड
सचिव सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन

बुद्धिबळ क्लासेससाठी संपर्क ९४२३२८०२५२

---

४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**एक शुभचिंतक**

---



तरुण भारतच्या वर्धापन दिनिमित्त शुभेच्छा!

६ वर्षापुढील खेळाडूंना धनुर्विद्या खेळाचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दीपक चिकणे यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते.

**धनुर्धर आर्चरी ॲकॅडमी, सोलापूर**

प्रशिक्षण ठिकाण

जिल्हा क्रीडा संकुल,
कुमठा नाका,सोलापूर
मो. ८१४९००१७१८



---

सोलापूर तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



- शुभेच्छुक -

प्रोप्रा. हरिदास (आप्पा) तुकाराम बागवडे

मो.९९७०७६०४४२
९७६५०२०२१०

**सौभाग्य**

अलंकार ॲण्ड जनरल स्टोअर्स

सर्व प्रकारचे बांगडी, स्टेशनरी, गिफ्ट व शालेपयोगीचे व्यापारी

०३, आनंद नगर, आय.टी.आय., विजापूर रोड, सोलापूर

॥ श्री माऊली प्रसन्न ॥

---

दै. तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

SDLTA

राजेश दमाणी
अध्यक्ष

राजीव देसाई
मानद सचिव

**सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना**

---

पद्मनगर कर्णिकनगर बास्केटबॉल अकॅडमीच्या वतीने

तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!



आनंद वल्लाकाटी — अध्यक्ष
श्रीशैल गुरव — उपाध्यक्ष
श्रीधर गायकवाड — सचिव
प्रबुद्ध चिंचोलीकर — सहसचिव

सदस्य

राजश्री चिप्पा, स्वाती कोठे, प्रा. राहुल हजारे, प्रा. अंकुश कांबळे, ॲड. राजू डिंगणे, सुशील नाटकर, बंटी क्षीरसागर, विशाल बनसोडे, अश्विन येदूर, श्रीधर ताटीपामुल.

---

तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

क्लबचे आदर्श



किरण नवगिरे — इंडीयन क्रिकेटर
अंजली चिट्टे व प्रसिध्दी जोशी — राष्ट्रीय खेळाडू
ऋतू भोसले — विद्यापीठ कर्णधार

शुभेच्छुक

**रागिणी वुमेन्स क्रिकेट क्लब सोलापूर**

- अध्यक्ष : सुभाष चव्हाण
- उपाध्यक्ष : अमृत हताळे
- संस्थापक : मल्लिनाथ याळगी
- प्रशिक्षक : तुषार सन्नके

मुलींच्या मोफत प्रशिक्षणासाठी संपर्क : ९७३०८७२०८७

---

दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

परस्परोपग्रहो जीवानाम्

शिक्षण हाच धर्म

एम.एस.एस. सोलापूर संचलित

**चतुरबाई श्राविका विद्यालय व महावीर हायस्कूल**

व्यंकटेश हौसींग सोसायटी, विकास नगर जवळ होटगी रोड, सोलापूर.

शुभेच्छुक

मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

इयत्ता पहिली ते दहावीचे प्रवेश सुरू आहेत.

संपर्क : ७३८७८६४८७० अथवा ९५४५४४९९३०

MEDICAL

SPORT


सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

## लायन मोहन शंकरसा भूमकर

अध्यक्ष लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी अध्यक्ष सोलापूर जिल्हा तायक्वाँदो स्पोर्ट्स कौन्सिल, अध्यक्ष विणकरबाग मित्र मंडळ, संस्थापक सल्लागार गुरुविद्या प्रतिष्ठान सोलापूर. ९४२२६५०७५०

**भूमकर गारमेंट होलसेल दरात मिळेल.**
गणेश पेठ, सोलापूर



UNITED CRICKET CLUB

दै. तरुण भारतच्या
४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

स्थापना १९६८

## युनायटेड क्रिकेट क्लब

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, सोलापूर

संस्थापक :
कै.रामभाऊ देगावकर, कै. मारुतीराव भागवत, श्रीकृष्ण खाडीलकर, पै. नजीर पैलवान, वीरेंद्र बसवंती व के. टी. पवार.

ॲड. निशिकांत देगावकर
कायदेशीर सल्लागार

प्रदीप नागवंशी – अध्यक्ष
चंद्रकांत रेम्बर्सो – उपाध्यक्ष
धवल शहा – खजिनदार
सुनील मालप – सचिव

प्रशिक्षक

सकाळी ६.30 ते ९.30
संजय मोरे, सुनील मालप, सईद शेख.

दुपारी 3.30 ते सायंकाळी ६.30 पर्यंत
विक्रांत पवार, चंद्रशेखर लोखंडे, सुकज जमादार

संपर्क : 7588214681 / 9890823352



तरुण भारत

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## हिंगुलांबिका प्राथमिक शाळा

२१/२२ साखर पेठ, सोलापूर. फोनः ०२१७-२९५१०९०

**सुपर सेमी (सुपर ३०) क्लासची सुरुवात २०२५-२६ पासून**





दै.तरुण भारतच्या
४१व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**शिवानंद अप्पासाहेब सुतार**
क्रीडा शिक्षक, गांधी नाथा रंगजी विद्यालय, सोलापूर



दैनिक तरुण भारतच्या
४१व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

## विराट स्पोर्टस् आणि पोलिस भरती करियर अकॅडमी

नेहरूनगर शासकीय मैदान, सोलापूर

- पोलिस भरतीची नवीन बॅच लवकरच सुरू होणार आहे.
- मैदान चाचणी व लेखी परीक्षेची तयारी करुन घेतली जाईल.
- लेखी परीक्षेची तयारी ॲड. सचिन शिंदे हे करून घेतील.
- शालेय ॲथलेटिक्स स्पर्धेचीही तयारी करून घेतली जाते.



**भारती सुर्याजी लिंगडे**
एन.आय.एस. प्रशिक्षिका

प्रशिक्षण स्थळ : नेहरूनगर शासकीय मैदान, सोलापूर
प्रशिक्षण वेळ : ६ ते ७.३० व सायंकाळी ५.३० ते ७.३०
संपर्क : ७७४३९०८२२९



दै.तरुण भारतच्या
४१व्या वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!

एक विचार...
एक नीती...
बांधिलकी समाजाप्रती...



गुरुजी
- एक प्रेरणा...
- एक प्रवास...
- जनसेवेचा अविरत ध्यास...

**दलितमित्र**
**स्व.चंद्राम चव्हाण गुरुजी**
यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन...

॥ आज परिश्रम कल लाभ ॥
मागास समाज सेवा मंडळ संचलित
**जय जवान जय किसान**
**मुलांची सैनिकी शाळा व ज्युनिअर कॉलेज**
नेहरू नगर, सोलापूर

इ. 11 वी (विज्ञान)
**ऑफलाईन प्रवेश सुरु**

शासनमान्य अनुदानित
फक्त मुलांसाठी पूर्ण
**निवासी शाळा**
- इ. ११ वी साठी प्रवेश सुरु (विज्ञान)
- इ. ६ वी ते ९ वी मर्यादित प्रवेश

जय जवान जय किसान
मुलांची सैनिकी शाळा व ज्युनिअर कॉलेज
डी.एड. कॉलेज कॅम्पस,
नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर

शाळेची वैशिष्ट्ये
- एका वर्गात फक्त ४५ विद्यार्थी
- सर्व स्पर्धा परिक्षांची तयारी (NDA, JEE, CET, NEET)
- सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा
- संपूर्ण निवासी संकुल
- भव्य क्रिडांगण व सर्व प्रकारचे क्रिडा साहित्य उपलब्ध
- उत्तम वसतीगृह व भोजन व्यवस्था
- सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे
- तातडीची वैद्यकिय सेवा
- कमांडंट व दोन शिक्षण निदेशक यांच्या देखरेखीखाली ड्रील व पी.टी.प्रशिक्षण

संपर्क : 9890921646, 7391919124, 8087413371, 8275516351



PADMASHRI SUMATIBAI SHAH VIDYAPITH
SHRAVIKA SANSTHA NAGAR
SOLAPUR

## श्राविका परिवाराकडून दैनिक तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

संस्थापिका



पद्मश्री
पं. सुमतीबाई शहा
श्राविका संस्था



शुभेच्छुक

## श्राविका शिक्षण संस्था, सोलापूर.

**श्री. यतीन सुभाष शहा**
(सचिव)

देवई हर्षवर्धन शहा
(विश्वस्त)

श्री. करण यतीन शहा
(विश्वस्त)




# सोलापुरातील श्री संतकवी शुभराय महाराज

## एक संस्कार वृक्ष...!

**यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत असे गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे. धर्माची ग्लानी म्हणजे श्रद्धेचा लोप पावणाऱ्या श्रद्धेची समाजात प्रतिष्ठेने पुन्हा प्रतिष्ठापना करण्याचे महान कार्य संतांनी केले आहे.**

सोलापूर हे अनेक भाषांचे माहेरघर..! इथे अनेक भाषा भगिनी सारख्या हातात हात घालून आनंदाने नांदतात. या सोलापूर शहराला ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. पैकी त्यातील धार्मिकतेचा पैलू तेजपुंज असाच आहे. श्री सिद्धरामेश्वरांच्या पदन्यासाने पुनीत झालेली सोलापूरची भूमी सोलापूरचे महान संत कवी श्री शुभराय महाराज यांच्या आगमनाने आणि त्यांच्या पुण्याने आणखी पावन झाली. अशा या थोर संतकवी शुभराय महाराजांचा जन्म बेंगलोर जवळील मालूर या गावी झाला. त्यांच्या जन्माचा काळ निश्चितपणे जरी उपलब्ध नसला तरी जन्म इ.सन. १७५० च्या सुमारास झाला असावा. श्री शुभराय यांचे मूळ नाव 'सुब्बाराव' असे होते. ते मोठे विद्वान पंडित होते. म्हैसूरचे राजे टिपू सुलतान यांच्या दरबारात उपपंतप्रधान पद भूषवित होते. पण त्यांचा मूळचा पिंड अध्यात्मिक असल्याने त्यांचे मन त्या पदावर रमले नाही म्हणून म्हैसूर सोडण्याचा ठाम निश्चय केला. सर्वसंग परित्याग करून त्यांनी आपले आई-वडील व पत्नीचाही त्याग करून ते आपल्या नियोजित कार्याच्या प्राप्तीस्तव म्हैसलगी नंतर पंढरपूर मार्गे इ. सन १७८१ मध्ये सोलापूर येथे स्थायिक झाले. अंतकरणांमध्ये विठ्ठलाचा वास असला तरी सद्गुरु शिवाय दर्शन नाहीच हे शुभराय महाराज जाणून होते. त्यामुळे परमपूज्य थिमप्पाच्या उपदेशानुसार महाराजांनी आपली ईशसेवा व नामस्मरण चालूच ठेवले होते. सद्गुरूंच्या असीम कृपेनेच महाराजांना तेथील वास्तव्यात एक दिवस पंढरीच्या विठ्ठलाचा दृष्टांत झाला. तो असा.. तुझी अनन्य भक्ती पाहून मी तुला प्रसन्न झालो आहे मला तुझ्याकडून सेवा करून घेण्याची इच्छा आहे तरी पंढरपूरच्या चंद्रभागेतील पुंडलिकाच्या डोहात मी आहे तू मला येथे आणून माझी प्रतिष्ठापना कर. पंढरपूरच्या विठू माऊली ने महाराजांना दिलेल्या अभिवचनानुसार प्रत्यक्ष पांडुरंग शुभराय मठात विराजमान झाले आहेत. त्याच शुभराय मठात माझा जन्म झाला. आमचं मोहोळकर कुटुंब मठामध्येच राहत होते. मठामध्ये बरीच कुटुंब होती कुटुंब जरी वेगवेगळी असली तरी मठात कोणताही उत्सव असला की सर्वजण आपल्या घरातीलच उत्सव आहे असे समजून एकत्र यायचा. श्री शुभराय महाराजांचा मठ हा त्यांच्या छत्रछायेत सुरक्षित होता, तसा मठातल्या सर्व कुटुंबांच्या आणि तिथल्या मोठ्या चिंचेच्या झाडाच्या सावलीत सुद्धा सुखावला होता. या मठामुळे माझ्या वडिलांना (कै. दत्तात्रय शंकर मोहोळकर) सगळ्यांपेक्षा वेगळं असं फार मोठं भाग्य मिळालं ते म्हणजे त्यांच्या वयाच्या ३५ पासून ते जवळजवळ वयाच्या बहात्तर पर्यंत शुभराय मठातील खुद्द शुभराय महाराजांनी स्थापन केलेल्या वालुकामय विठ्ठलाची पूजा करण्याचं..! त्यामुळे आमच्या कुटुंबाची नाळ मठाशी छान जोडली गेली होती ती आज तागायत आहे



माझे वडील त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षापासून मठातच राहिले. माझी आजी कै.उमाबाई शंकर मोहोळकर माझे दोन्ही काका कै.बाळकृष्ण शंकर मोहोळकर आणि कै.गजानन शंकर मोहोळकर हे सुद्धा मठातच लहानाचे मोठे झाले. आजी मठात असल्यामुळे तिथल्या भजनी मंडळात होती त्याचे नाव 'रामनाम व्रत आश्रम'. पुढे माझी आई श्रीमती मीरा दत्तात्रय मोहोळकर याच भजनी मंडळात होती त्यामुळे मठाशी असलेलं भक्तीचं नातं अजून दृढ झालं.

शुभराय मठामध्ये सर्वच उत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरे केले जात होते ते अजूनही चालू आहेत. गुढीपाडव्यापासून ते आषाढी एकादशीची रथयात्रा. वाळूकामय विठ्ठलाची मूर्ती जेव्हा मठात आली तो दिवस आषाढ शुद्ध एकादशीचा सन १७८५..! तेव्हापासून ते आज तागायत आषाढ एकादशी आणि कार्तिकी एकादशीला रथाची मिरवणूक सोलापूर शहरातून निघत असते. नंतर गोकुळाष्टमी. यावेळी तर मठ अगदी गोकुळासारखा सजायचा प्रत्येका खांबाला नारळाची आणि केळाची डहाळी माझे बाबा लावायचे.बाबांबरोबर मी आणि माझी बहीण (पूर्वाश्रमीची अश्विनी मोहोळकर आणि आता सौ. मंजिरी साने) त्यांना मदतीला असायचो. काय वर्णन करू..? शब्द अपुरे पडतात.. रात्री बुवांचे ( मठाधिपती जयकृष्ण जनार्दन बुवा) किर्तन, त्यांच्याबरोबर तबला साथीला मी स्वतः असायचो. त्यानंतर शुभराय महाराज पुण्यतिथी..! अदल्या दिवशी महाराजांची समाधी फुलांनी छान सजवली जात होती. अजूनही सजवतात. आम्ही लहान लहान मुलं रात्री भोपळा फोडण्यासाठी एकत्र येत होतो. पुण्यतिथीला सकाळी दहा वाजता काटकर आजी यांचे भजन ठरलेले असायचे. कोणीही जरी बोलवले नाही तरी त्या त्यांच्या ताफ्यासहित येत असत. हार्मोनियम त्या स्वतः वाजवायच्या. तबल्यावर साथ करायला जुन्या राम मंदिरातील पुजारी म्हणून येत असत. भजनानंतर महाआरती...! वा... वा... आता लिहिताना सुद्धा अंगावर काटा उभा राहतो समोर तो प्रसंग उभा राहतोय. अशा सर्वच उत्सवात आणि भक्ती सांप्रदायिक वातावरणात आम्ही लहानाचे मोठे झालो. माझ्या वडिलांना शुभराय मठातील पांडुरंगाची सेवा करण्याचे भाग्य मिळाले . दररोज पहाटे तीन वाजता उठायचे हातामध्ये झाडू घेऊन संपूर्ण मठ आणि मठाचा परिसर तसेच मठासमोरील भाग, दत्ताच्या देवळासमोरील भाग झाडून घ्यायचा. सडा टाकायचा, सुंदर रांगोळी रेखाटायची. हे सर्व करून पुन्हा घरी येऊन स्नान करून मठात जाऊन पूजा करायची. मग देवाचं तीर्थ घेऊन ते घरी यायचे. असा दिनक्रम जवळपास ३५ ते ४० वर्ष त्यांच्याकडून विठ्ठलानेच करून घेतला.

कार्तिक महिन्यात आणि अधिक महिन्यात पहाटे काकड आरती असायची. त्यावेळेला तर पहाटे अडीच वाजताच माझे बाबा उठायचे. माझी मुंज झाल्यापासून माझ्या बाबांनी मला घरातील पूजा करायला शिकवली होती. त्यामुळे मीही त्यांच्याबरोबर काकड आरतीसाठी जायचो बरोबर ५.१५ मिनिटांनी मठामध्ये जायचो. त्यानंतर बरोबर पावणेसहा वाजता काकडा सुरू व्हायचा. उठा साधकजन साधा आपुलाले हित.. साधा आपुलाले हित.. मठातील माँ अर्थात निर्मला जयकृष्ण बुवा! या हातामध्ये टाळ घेऊन डोळे बंद करून काकडा म्हणायच्या. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर वाटायचे की देव दिसतो की काय त्यांना...? कारण, काकडा म्हणताना हसत असायच्या. काकड आरती मध्ये जसे सोपस्कार सांगितलेले आहेत त्याप्रमाणे माझे बाबा तयारी करून ठेवत. जसे की.. लोणी साखरेची वाटी आणू पांडुरंगासाठी असे म्हटले की.. देवासमोर लोणी आणि साखरेची वाटी ठेवायचे. कोणाची झाली दृष्ट माझ्या हो पंढरीराया लिंबलोण उतरू कशी ओवाळीन काया... विठ्ठलाला दृष्ट लागू नये म्हणून बाबा विठ्ठलाच्या गालाला तीट लावत. नंतर ते तीट लावायचा सोपस्कार माझ्याकडे आला.

माझ्या वडिलांनी पांडुरंगावर आणि शुभराय महाराजांवर नित्सीम प्रेम केलं, सेवा केली. त्या सेवेचा फलित आमच्या पदरात पडत आहे. माझे वडील २४ जून २०१९ संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थानाच्या दिवशी पांडुरंग चरणी विलीन झाले . त्यांनी केलेल्या पुण्याचे फलित म्हणून की काय माझ्या हातून शुभांगी बुवा यांनी एक असे कार्य करून घेतले की.. त्याला तोडच नाही. मी माझ्या कामांमध्ये असताना अचानक शुभांगी बुवा यांचा फोन आला. उमेश... तू लवकर मठात ये. मी म्हणालो.. आलोच..दहा मिनिटात! गेलो तर म्हणाल्या.. आपण आता एक उत्सव मूर्ती तयार केलेली आहे त्याची प्राणप्रतिष्ठापना तुझ्या आणि तुझ्या बायकोच्या हस्ते करायची आहे. मी दोन मिनिटं स्तब्ध झालो. प्राणप्रतिष्ठापना आणि माझ्याकडून..? त्या म्हणाल्या..हो.. त्यावेळी माझ्या डोळ्यातून आनंद अश्रू वाहत होते..वाटलं, आज जर माझे वडील असले असते तर त्यांच्याच हस्ते हे कार्य घडले असते. पण देवाच्या मनात काय असतं याचा कुणाला थांगपत्ता नसतो. त्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापने मी आणि स्वरांगी माझी पत्नी पूजेसाठी मठात आलो.पुण्यवाचन झाले नंतर होमासाठी अग्नी तयार झाला.. तोही पारंपारिक पद्धतीने!लाकडावर लाकूड घासून. अग्नीदेवतेचे स्मरण करताच तोही प्रगट झाला. परमेश्वराची लीला आघात आहे. स्वहाकार झाला. त्या पाषाणाच्या मूर्तीला मी डोक्यावर घेतले. तेव्हा वाटलं या जगतनिर्मात्याला मी माझ्या स्वतःच्या डोक्यावर घेतले. काय सांगू तो प्रसंग... वाटलं कृतकृत्य झालो,जन्माचं सार्थक झाल्यासारखे वाटले. देव मठातल्या देवघरात आले. त्याची विधिवत पूजा झाली,आरती झाली. प्रसाद घेऊन आम्ही घरी आलो. मनात एक विचार आला. का बरं मला सांगितलं असेल प्राणप्रतिष्ठापना करायला...? मी हे शुभांगी ताईंना विचारले... तर त्या म्हणाल्या.. मी गेले आठ दिवस शोधत होते कुणाच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना करायची? काही केल्या मला समजेना..पहाटे चार वाजता मी जागी झाले.. मनात विचार आला दत्ता काकांच्या मुलाकडूनच हे कार्य घडून आणू आणि मग मला झोप लागली.. कसले संकेत म्हणायचे याला..? कोणते पुण्य घडले असेल माझ्याकडून...? नंतर लक्षात आले.. हे तर बाबांनी केलेल्या पुण्याचे फळ आहे. डोळ्यातून पाणी काही थांबेना.करता कविता परमेश्वर आहे हे पक्क झालं. मठात पांडुरंगाच्या उत्सव मूर्तीची आणि शुभराय महाराजांच्या समाधीची प्राणप्रतिष्ठापना झाली. एक कोटी नामजपाचा स्वाहाकार झाला.अकरा ब्रह्म वृंदांच्या साक्षीने तो पार पडला. काही गोष्टी परमेश्वर आपल्याकडून करून घेतो हे नक्की! असाच एकदा शुभांगी ताईंचा फोन आला आणि म्हणाल्या.. शुभराय महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त एक नृत्यनाटिका बसवायची आहे त्यात तू रावजीबुवा म्हणजे शुभराय महाराजांचे सोलापुरातील पहिले शिष्य! आत्ताची ही रावजी बुवांची आठवी पिढी..त्यांची भूमिका करायची आहेस. मी ताडकन उडालो..बापरे...! नाटकात आणि मी! त्यांना म्हणालो... आतापर्यंत नाटकात काम केलेले नाही..त्यावर त्या म्हणाल्या.. महाराज करून घेतील तुझ्याकडून.. प्रॅक्टिसला ये.. सुरू झाली प्रॅक्टिस.. माझ्याकडून नाटकातील संवाद दिग्दर्शक माझाच भाऊ डॉक्टर राजू मोहोळकर यांनी व्यवस्थित बसवून घेतले. साधारणपणे आठ दिवसाच्या प्रॅक्टिसनंतर हुतात्मा स्मृती मंदिर येथे नाटकाचा उत्तम प्रयोग पार पडला. नाटकाच्या भैरवीकडे जाताना मला माझ्या वडिलांची खूप खूप आठवण झाली. डोळे पाणावले होते.वाटलं.. आज जर ते असले असते तर मला डोक्यावर घेतलं असत..! काय करणार.. असो, पण त्यांनी हे नाटक पाहिलं असणार हे नक्कीच! पूर्व पुण्याईमुळे मला परमपूज्य रावजीबुवा यांची भूमिका करायला मिळाली. म्हणतात ना.. जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले मग त्या विठ्ठले कृपा केली.जन्मोनी संसारी झालो त्यांचा दास मज तो विश्वास पांडुरंग पूर्व सुकृताशिवाय या गोष्टी शक्य नाहीत हे पुन्हा एकदा सिद्ध झालं.. म्हणूनच म्हणावसं वाटतं श्री संतकवी शुभराय महाराजांचा मठ हा एक मनावर होणाऱ्या संस्काराचा मोठा वृक्ष आहे.



उमेश मोहोळकर
सोलापूर
९६३७९६७७५५

# सोलापूर शहरातील प्रदूषण नियंत्रण

**आपल्या मुख्य विषयाकडे वळल्यापूर्वी शहरीय प्रदूषण म्हणजे काय? किंवा त्याची व्याख्या कोणती ते आपण पाहू. (प्रेझेन्स ऑर इंट्रोडक्शन ऑफ पॉयसनस ऑर हार्मफुल सबस्टन्स इन सिटी, पेरिफेरी इन ऑल इन्व्हरमेंटल एलिमेंट)शहर आणि शहरालगतच्या सर्व प्रकारच्या पर्यावरण घटकांमध्ये विषारी किंवा घातक घटक आढळण्याला शहरीय प्रदुषण असे म्हणतात. आपल्याला माहितीच आहे की प्रदूषणाचे प्रामुख्याने चार प्रकार आहेत. हे प्रकार खालील प्रमाणे १. हवा किंवा वायुप्रदूष २. पाणी प्रदुषण ३.मृदा किंवा भूमी प्रदुषण ४. ध्वनि प्रदुषण.**

आपल्या सोलापूरच्या अनुषंगाने आपण या प्रदुषणाचा विचार करुयात .सर्वप्रथम आपण सोलापूरातील वायुप्रदुषणाचा विचार करुयात. सोलापूर शहर व जिल्हा हा पर्जन्यछायेच्या प्रकारात मोडतो. म्हणजे पावसाचे प्रमाण तुलनेत कमी असते. पावसाअभावी हवा ही शुष्क, कोरडी होते. त्यामुळे इतर प्रदुषित वायुसोबत धूलिकण ही हवेत असतात. सोलापुराचा ir quality index हा साधारणपणे ८४-१११ इतका असतो म्हणजे सोलापूरातील (QI) हा सेव किंवा healthy प्रकारत येत नाही.यावरून आपल्याला समजते की शहरातील हवेतील प्रदुषणाची पातळी ही जास्त आहे. सोलापूर शहर व शहरालगतच्या चखऊ मधील औद्यागिक क्षेत्रे, इतर सेवा संस्था, शहरातील वाहतुक या गोष्टी मुख्यतः यास कारणीभूत आहेत असे आपण मानू शकतो.

वायुप्रदूषण कमी करण्यासाठी काही उपाय आहेत, ते करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था अद्ययावत असणे व तिचा वापर जास्तीत जास्त व्हावा यासाठी प्रयत्न करणे, महानगरपालिकेने बसेस अद्ययावत / सुस्थितीत असतील, तसेच प्रवाश्यासाठी वेळा सोयीचा असतील या कडे लक्ष दिले पाहिजे. जेणेकरून प्रदुषण पातळी कमी होईल. सार्वजनिक वाहतूक वापरण्याकडे लोकांचा कल वाढेल. रस्तेबांधणी व रस्त्यांचे नियोजन करताना पादचारी व सायकल मार्गाची व्यवस्था केली गेली पाहिजे. कार पुलिंग, शेयर साईड, इलेक्ट्रिक वाहने, उछ्रङ्ग वाहनांसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रिन झोन वाढवले पाहिजेत, सोलापुरातील ग्रीन झोनचे उत्तम उदाहरण म्हणजे स्मृती उद्यान - भारतातील इतर काही शहरांप्रमाणेच सोलापूरातही एक किंवा दोन सोसायटी साठी बागांची व्यवस्था केली पाहिजे. तसेच ग्रीन रुफ या संकल्पनेनुसार टेरेसवरील बागा, झाडे वाढावीत यासाठी ही प्रोत्साहन दिले गेले पाहिले. कचरा (कोणत्याही प्रकारचा )हा जाळला जाऊ नये. त्याने ही प्रदुषणातभर पडते. सोलापूर शहरातील जास्त प्रदुषित जागी पिंपळ, वड, कडुलिंब, अशोक, अर्जुन, जांभुळ




अश्या झाडांची लागवड केली गेली पाहिजे. विकसित देशांमध्ये सार्वजनिक एअर प्युरीफाईंग सिस्टीम प्रचलित आहेत - सोलापूरसाठी अशी व्यवस्था करता येईल का? याचा विचार केला गेला पाहिजे.

सोलापूरातील जलप्रदूषणाचा विचार करताना शहरातील तीन तलावांमधील प्रदुषण, पिण्याच्या पाण्याच्या वितरणातील प्रदुषण, सांडपाणी व्यवस्था या बाबींवर विचार केला गेला पाहिजे. आपल्या सोलापूरात हिप्परगा, कंबर (संभाजी), सिध्देश्वर तलाव आहेत. हिप्परगा तलाव हा त्यातील पाण्याच्या उपयुक्ततेबरोबरच जैवविविधता तसेच विदेशी स्थलांतरीत पक्षी अधिवास व पक्षी निरीक्षणसाठी प्रसिध्द आहे. कंबर तलावात पूर्वी कमळे होती व तो प्रसिद्ध ठिकाण म्हणून सर्वांना परिचित होता. या तलावांमध्ये कपडे धुणे, जनावरे धुणे ,कचरा फेकणे इ. गोष्टीमुळे पाणी प्रदूषित होत आहे. याला आळा घातला पाहिजे. गणपती विसर्जनाच्या वेळी ही जलसाठ्यांची विशेष काळजी घेतली गेली पाहिजे. सोलापूरात अनेकदा पिण्याचे पाणी दुषित आढळल्याच्या तक्रारी असतात. पिण्याच्या पाण्याची व सांडपाण्याची व्यवस्था यामधील समन्वय नसल्याने अश्या गोष्टी होतात. महानगर पालिकेने या व्यवस्था नीट केल्या पाहिजेत. बऱ्याच सार्वजनिक नळांना तोट्या नसतात. त्यामुळे प्रक्रिया केलेले पाणी वापर न होताच वाया जाऊन सांडपाण्यात रुपांतरित होते. या गोष्टीचीही काळजी घेतली पाहिजे. आहेरवाडी व देगाव येथे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आहेत. यात आधुनिक प्रगत प्रक्रिया व उपकरणांचा वापर, अद्यावत तंत्रज्ञान वापरले पाहिजे, औदयोगिक प्रकल्प व उद्योगातील सांडपाण्यासाठी प्रक्रिया व पर्यावरण विषय कायदे यांचे कडक पालन केले पाहिजे. मृदा किंवा जमिनीचे प्रदूषण हे प्रामुख्याने लॅन्डफिल साईट ,ज्याला आपण डंपिंग ग्राऊंड म्हणतो त्याने होते आहे. सोलापुरासाठी तुळजापूर रोड येथे व भोगाव येथे डंपिंग ग्राऊंड आहेत. शहरातील घंटागाड्या मधुन येथे कचरा टाकला जातो. याने जमिनीबरोबरच हवा, भूगर्भातील पाणी, यांचे ही प्रदुषण होते आहे. अनेक वेळा आपल्याला येथे आग लागल्याचे प्रकार होतात. त्याने दुषित वायू हवेत मिसळतात. कचरा प्रक्रिया प्रकल्प हा अधिक जास्त सक्षम करण्याची आवश्यकता आहे. याची मुळापासूनच सुधारणा केली गेली पाहिजे ती म्हणजे कचऱ्याचे वर्गीकरण प्रत्येक घरात झाले पाहिजे. सुका व ओला कचरा असे वर्गीकरण बंधनकारक केले पाहिजे. असे केल्याने पुढे कचऱ्याचे व्यवस्थापन सोईचे होते. बायोहजार्ड, कचऱ्याची वेगळी विल्हेवाट लावायची व्यवस्था ही सक्षम हवी. कचऱ्यातील पुर्नवापर करता येण्यासारख्या घटकाचे पुर्नवापरासाठी वर्गीकरण केले गेले पाहिजे. उदा. कागद, काच, मेटल, रबर आणि आता प्लॅस्टीकचेही पुर्नवापर करता येतो. सोलापूरातील कचऱ्यापासून विजनिर्मिती प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढवली पाहिजे व नविन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. कमी मायक्रॉनच्या प्लास्टिकवरची बंदी कडक केली पाहिजे.

ध्वनी प्रदुषणाबाबतीत आपण आता जागृत झालो आहोत. सोलापुर हे उत्सवप्रिय शहर म्हणून ओळखले जाते. छोट्या मोठ्या सर्व उत्सव, जयंतीसाठी साऊड सिस्टीम, डॉल्बीचा वापर होतो. तो संपूर्णपणे टाळणे शक्य नसल्यास डेसिबलचे नियम पाळले पाहिजेत तसेच वेळेचे ही बंधन आवश्यक आहे. वाहतुकीच्या ध्वनीप्रदुषणासाठी छे कींप ही मोहिम काही वर्षांपूर्वी एका वृत्तपत्राने राबवली होती ती जनमानसात रुजली पाहिजे. सोलापूरातील प्रदुषणासाठी केवळ महानगरपालिका किंवा सामाजिक संस्था यांनीच काम केले पहिजे अशी मानसिकता बदलून सर्व स्तरावर जागृती होऊन, ही सर्व नागरिकांची जबाबदारी आहे ही भावना वाढली पाहिजे. एक नागरिक म्हणून सुद्धा आपण काही गोष्टी आपल्या लाडक्या शहरासाठी केल्या पहिजेत. उदा. खरेदीसाठी घरातील कापडी पिशवी वापरणे, जिथे शक्य आहे तिथे सर्वप्रकारच्या प्लास्टिकचा वापर टाळणे, आपल्या घर परिसरात झाडे लावणे, शक्य तिथे चालत जाणे, सायकल वापरणे, रददी घालणे, भंगार घालणे, पानी वाचवणे आपले सोलापुर स्मार्ट , सुंदर व प्रदुषणमुक्त होण्यासाठी प्रशासन , सामाजिक संघटना व नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नाची गरज आहे. हे भविष्यात होईल अशी फक्त आशा न करता आपण त्यासाठी स्वतः प्रयत्न करूयात.



श्रीया पंडित
लेखिका
९६६५०६५७०८




## सोलापूर उदयोन्मुख पर्यटन केंद्र

**सोलापूर हा महाराष्ट्रातील आग्नेय दिशेला वसलेला जिल्हा असून भीमा व सीना नद्यांच्या खोऱ्यात या जिल्ह्याचा विस्तार आहे. ही नगरी हुतात्मा नगरी म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. सोलापूरातील मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे या महान देशभक्तांना इंग्रजांनी फाशीची शिक्षा दिली होती. सोलापूर ही डॉ. कोटणीस, कवी संजीव, कवी रा.ना. पवार, पद्मश्री मारुती चितमपल्ली, अभिनेता अतुल कुलकर्णी,दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्यासह अनेक नामवंत मान्यवरांची जन्मभूमी आहे. अनेक दिग्गज कलावंत, साहित्यिक, खेळाडू, उद्योजक, डॉक्टर्स,शास्त्रज्ञ, इंजिनिअर्स,शिक्षक यांनी हा जिल्हा नटलेला. सोलापूर ही अनेक संतांची भूमी आहे.**

### सोलापूरची बलस्थाने....

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील आग्नेयकडील जिल्हा असला तरी तो सबंध भारताशी रस्ते, रेल्वे व विमान मार्गाने जोडला गेला आहे.उत्तर व दक्षिण भारताला जोडणारे सोलापूर हे जणू सेतूबंधाचे कार्य करते.सोलापूर येथील वातावरण उष्ण व कोरडे असले तरी संपूर्ण वर्षभर येथील हवामान पोषक असते. हा पठारी प्रदेश असल्याने येथून मानवी व मालाची वाहतूक करणे सुलभ जाते. सोलापूरसाठी उजनी धरणातून शेती व पिण्यासाठी बारमाही पाणीपुरवठा होत असल्याने पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. सोलापूर शहराजवळ नॅशनल थर्मल पॉवर स्टेशन पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याने सोलापूर येथे वीजपुरवठा अखंड सुरू असतो.




मयुरेश कुलकर्णी


सोलापूर

९४२१०२४८८१


सोलापूर येथील जागेचे दर पुणे व मुंबई येथील जागेपेक्षा खूपच कमी असल्याने घर बांधून राहणे किंवा भाड्याने राहणे परवडण्यासारखे आहे.सोलापूर शहराच्या कोणत्याही एका दिशेकडून प्रवास सुरू केल्यास विरूद्ध दिशेकडील शेवटचा भाग अवघ्या अर्ध्या तासात गाठणे शक्य होते. पुणे, मुंबई, संभाजीनगर, नागपूर अशा मोठ्या शहरांप्रमाणे तासन्तास वाहतूक कोंडीत अडकावे लागत नाही. इतर शहरांच्या तुलनेत हवा शुद्ध आहे. अनावश्यक प्रदुषणाचा धोका नाही. उच्च वैद्यकीय सुविधा व उत्तम शैक्षणिक संस्थांनी येथे सेवा पुरवल्या आहेत.सोलापूर शहरातील राहणीमानाचा खर्च सर्व स्तरातील लोकांना परवडण्यासारखा आहे. सोलापूर शहराची ही बलस्थाने लक्षात घेता सोलापूर हे शहर नागरी वसाहतीस एक आदर्श शहर आहे.

### सोलापूर पर्यटन संधी....

सोलापूर येथे चोहोबाजूंनी पाण्याने वेढवेले रमणीय असे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराज समाधी मंदिर ,सोलापूर शहराच्या जवळ भूलौकिची वैकुंठभूमी पंढरी, महाराष्ट्राचे आराध्य दैवत तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिर, अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ समाधी मंदिर, मंगळवेढा येथील संत दामाजी मंदिर ,संत चोखोबा मंदिर, संत महात्मा बसवेश्वर मंदिर आहे. अरण येथे संत सावता महाराज मंदिर आहे. नळदुर्ग किल्ला, तेथील नरमादी धबधबा, रामलिंग मंदिर येथून जवळच आहे. जगप्रसिद्ध गोलघुमट विजयपूर येथे शंभर किलोमीटरवर आहे. वरील सर्व व इतर आणखी काही धार्मिक, नैसर्गिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळे सोलापूर शहराच्या अवतीभोवती असल्याने येथे कायम भक्त व पर्यटकांचा राबता असतो. या सर्व बाबी लक्षात घेता सोलापूर शहराचा विकास एक पर्यटक केंद्र म्हणून होणे आवश्यक आहे. येथे आंतरराष्ट्रीय सेवासुविधा पुरवणारी,अल्प व माफक दरातील हॉटेल्स, लॉज, घरगुती निवास सुविधा उपलब्ध करण्यात यावी. ओला उबेर सारखी किंवा इतर ऑनलाईन टॅक्सी सेवा सुरू करण्यात यावी. मराठी, हिंदी, इंग्लिश सह इतर अनेक भारतीय भाषात उत्तम गाईड निर्माण केल्यास सोलापूर येथे एक ते तीन दिवस मुक्काम करून सोलापूर भागातील पर्यटनाचा आनंद घेणारी पर्यटक संख्या वाढू शकते. आपण हॉस्पेट येथे राहून ज्याप्रमाणे हंपीच्या पर्यटनाचा आनंद घेतो, त्याप्रमाणेच सोलापूर शहराचा पर्यटक केंद्र म्हणून विकास होणे आवश्यक आहे. या कामी स्थानिक



प्रशासन, लोकप्रतिनिधी, पर्यटन विकास मंडळे, सेवाभावी सामाजिक संस्था यांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता आहे.

### पर्यटन केंद्राचे लाभ....

सोलापूर शहर जर अशाप्रकारे पर्यटन केंद्र म्हणून तयार झाले तर, येथील रोजगाराच्या संधी वाढतील. सोलापुरी चादर, कडक भाकरी, शेंगाचटणी, हुरडा या स्थानिक खाद्यपदार्थांना बाजारपेठ मिळेल. स्थानिकांचे इतर शहरात होणारे रोजगारानिमित्त स्थलांतर कमी होईल. लोकांच्या हाती पैसा खेळू लागल्यावर येथील स्थानिकांचे राहणीमान निश्चितच उंचावेल, असा शंभर टक्के विश्वास वाटतो. यासाठी सोलापूर येथील सुप्रसिद्ध कवी दत्ता हलजगीकर यांच्याच भाषेत सांगायचे तर, आता सोलापूरसाठी.

**ज्यांची बाग फुलून आली,**
**त्यांनी दोन फुले द्यावीत ज्यांचे सूर जुळून आले,**
**त्यांनी दोन गाणी द्यावीत**

---

## वाटेवरले तत्वज्ञ

**तत्वज्ञान केवळ ग्रंथातून, पुस्तकातून, व्याख्यानातून, प्रवचनातून किंवा बौद्धिक चर्चेतूनच मिळतं हा आपण पुर्वापार करून घेतलेला समज आहे, तो चुकीचा आहे असं न म्हणता तो तेवढाच मर्यादीत नाही असं म्हणणं जास्त संयुक्तीक वाटतं. आपण भेटू ती माणसं काही ना काही तत्वं सांगून जातात, ती तत्वं साधी, सोपी, गुढ, अशा वर्गीकरणात न मोडता, जगतांना ती कुठे ना कुठेतरी उपयोगात आणता येतील किंवा ती आपसूक उपयोगात येतील, त्यांचे संदर्भलागतील अशीच असतात. तत्वं, समाजातल्या कुठल्या विशिष्ट घटकांपुरतीच मर्यादीत आहेत असं नाही, तर अगदी रस्त्यावर चालता चालता वाटेतही अशी माणसं भेटतात की जगण्याचं तत्वज्ञान अगदी सहजी सांगून जातात, विचार करायला भाग पाडतात.**

एक प्रसंग आठवतो, कोरोना काळातला आहे, रामनवमीचा दिवस होता थोडीशी नियमांमध्ये शिथिलता दिली होती जेणेकरून बाजारातून पुजेचं साहित्य, हार, फूलं वगैरे आणता येतील. फूटपाथवर एक आजीबाई थोडीशी फूलं, हार पोत्यावर पसरून बसल्या होत्या, एप्रीलचा महिना, ऊनही वाढलं होतं, आजींना म्हणलं 'हार आणि थोडी फूलं द्या, आज रामनवमी आहे ना, पुजा करायचीये' फारशी गर्दी नव्हती त्यांच्याकडे, त्यांनी माझ्याकडे पाहीलं आणि सहज बोलून गेल्या, देवानंच ह्यो कोरोना आनलाय, म्हणजी लोकं घरात बसतील, देवाचा ईसर पडलाय आता थुडं नाव घेतील, पुजा करतील, पोथ्या बित्या वाचतील, काळजी घेतील एकमेकांची, साधं, ताजं चांगलंचुंगलं खातील.. देवाची जाणीव ठेवतील... मी त्यांच्याकडे पाहातच राहीलो.. मनोमन त्यांना नमस्कार केला.. वाटलं खरंच ह्या हारफूलं विकणार्या आजींनी किती सहजपणे आध्यात्मतली अत्यंत' बेसिक फीलोसा फी' सांगितली, त्यांनी कुठं वाचलं, एकलं असेल ?..




वर्धराज मिर्जी

सोलापूर

९३७१०२६२९७


असाच एक प्रसंग आठवतो, एक ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी गेलो असतांना तिथल्या पायर्यांच्या बाजूला छोटे छोटे व्यावसायिक कांही वस्तू विकायला बसले होते.. एकाकडून खरेदी केली आणि जेमतेम साठ सत्तर रूपये झाले असावेत, त्याला शंभराची नोट दिली. त्याच्याकडे सुट्टे पैसे नव्हते.. तसा आम्हाला उशीर झाला होता त्यामुळे ट्रॅव्हल्सचे कर्मचारी खूप घाई करू लागले.. त्यामुळे विक्रेत्याला म्हणलं सुट्टे नसतील तर राहू देत निघायला हवं आणि आम्ही झरझर पार्या उतरायला



लागलो, निम्म्या अंतरावर पोहोचलो तर तो विक्रेता धावत पळत धापा टाकत उरलेले पैसे घेवून आला, त्याला म्हणलं अरे राहू द्यायचं ना.. एवढ्या लांब कशाला आलास, तर तो म्हणाला, साहेब, देव बघतो आपल्याकडे, इमानदारीत धंदा केला तर प्रगती होईल, बरकत देईल तो.. नाहीतर सगळं ओढून घेईल तो.. क्षणभर त्याच्याकडे पाहतच राहीलो... त्याला म्हणलं भविष्यात तुझं मोठं दुकान होईल बघ.. अशा मनापासुन शुभेच्छा देत परतलो... त्यानं ईमानदारीचा, प्रामाणिकपणाचा, नम्रतेचा जणू परिपाठच करून घेतला असं वाटलं.. तत्वज्ञानाचं हे शिक्षण त्यानं कुठे घेतलं असेल..? एकदा रिक्षात बसलो असतांना ट्राफीक सिग्नल लागला, रिक्षा थांबली तसा एक भिकारी आला, त्याला दहा रूपयाची नोट दिली. रिक्षा ड्रायवर हे पाहात होता. सिग्नल सुटला आम्ही पुढे निघालो, तसा रिक्षा ड्रायवर म्हणाला साहेब वाईट वाटून घेवू नका एक सांगू का, त्या भिक मागणार्याला सहज तुम्ही दहा रूपयाची नोट दिली.. पण त्याचा तो योग्यच वापर करेल, हे सांगता येईल का ? दुरूपयोग ही होवू शकतो.. तो म्हणाला आपली मुलं आपल्याला पैसे मागितली तर आपण दहा प्रश्न विचारतो ना.. का पाहीजे, कशाला पाहीजे.. मग प्रश्न दहा रूपयाचा असो की दहा हजाराचा.. मग इथं असा प्रश्न का पडत नाही.., देण्याविषयी काही नाही साहेब, वाटलं म्हणून बोललो.. सारी बरं का! असं बोलून तो गप्प झाला.. मी विचार करायला लागलो अरे खरंच की ... असा विचार आपण केलाच नाही.. आता पाहा.. रिक्षावाल्यानं मला व्यवहारिक तत्वज्ञानाचं लेक्चरच दिलं... कुठल्या शाळेत, महाविद्यालयात, विद्यापीठात.. हे असं सोदाहरण तत्वज्ञान कळेल, उमजेल.. असं वाटून गेलं...अशी कैक माणसं, प्रसंग आपण अवती भवती अनुभवत असतो.. कधी कोण काय शिकवून जाईल, लाखमोलाची गोष्ट अवघ्या क्षणात सांगेल हे सांगता येत नाही... असं म्हणतात प्रत्येक माणसांत गुरूतत्वं असतं.. ते कधी जागृत होवून जगण्याचं खरं मुल्यशिक्षण देईल हे गुढच आहे.. आपण मात्र समोरच्या माणसातल्या गुरूतत्वाला' राम राम' करायचा आणि आपल्या जगण्यातला 'राम' शोधायचा असतो.. असं वाटून गेलं.

---

## भीमाशंकर जंगल ट्रेक

**भीमाशंकर जंगल ट्रेक हे नाव वाचूनच ट्रेकला जायची इच्छा जागृत झाली. पूर्वी कळसुबाई आणि नाणेघाट असे दोन ट्रेक इको फ्रेंडली ग्रुप बरोबर केले होते. शुक्रवारी रात्री दोन बस भरून ७० एक माणसं आम्ही या ट्रेकला गेलो. आणि आज सकाळी सोलापूरला काही लोक पुण्याला काही इतर ठिकाणी गेले. कोणतं हिरवे संचित आम्ही सगळे लोक घेऊन आलो ते केवळ शब्दात मांडणे अशक्य आहे.**

ना धो महानोर म्हणतात
या नभाने या भुईला दान द्यावे
आणि या मातीतून चैतन्य गावे.

या ओळींचा अक्षरशः अर्थ आम्हा सगळ्यांना या ट्रेकमध्ये कळाला. पाऊस पडतो म्हणजेच नभ भुईला दान देते मातीतून चैतन्य गाते म्हणजे काय.. हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणांच्या मखमालींचे. या ओळींचा अर्थही आम्हाला भीमाशंकर परिसरातील हिरवे हिरवे गालीचे पाहून समजत होता आणि आमच्या डोळ्यांचे पारणे फिटत होते. क्षणात सुरू होणारा पाऊस आणि क्षणात थांबणारा पाऊस मन वेडावून टाकत होता. आमची सगळी हिरवी निसर्ग प्रेमी टीम एकमेकांना हात देत, निसर्गाचा आनंद घेत, रिमझिम पावसामध्ये सह्याद्री मध्ये मनमुराद फिरत होती. वाटेतअसंख्य धबधबे, ओढे होते. ओढ्यांमधून वाहणाऱ्या पाण्याचे एक वेगळेच संगीत मनाला सुखावून जात होते. या सगळ्यातून चैतन्याच्या लहरी निर्माण होत होत्या. या सगळ्या लहरी आम्हा सगळ्यांना चैतन्यमय करत होत्या. दुसऱ्या दिवशी भोरगिरी किल्ल्याचा ट्रेक आणि देवकुंड धबधब्यात केलेली धमाल चिरंतन स्मरणात राहील. असंख्य फोटो, बेसुमार आठवणी घेऊन सगळे आपापल्या गावी परतले.

जेव्हा नव्हते चराचर
तेव्हा होते पंढरपूर
जेव्हा नव्हती गोदा गंगा
तेव्हा होती चंद्रभागा
असे म्हणतात
चंद्रभागा म्हणजे भीमा नदी



भीमा नदीचे उगमस्थान या ट्रेक मध्ये पाहायला मिळाले. अतिशय महत्त्वाचे असलेले ज्योतिर्लिंग म्हणजे भीमाशंकर. आणि या पवित्र अध्यात्मिक परिसरात निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केली आहे. घरांच्या छतावर गवत उगवलेले आहे. जवळपास अनेक घरांची छते हिरवी दिसतात. अनेक भिंती आहेत. अनेक दगडांवर शेवाळे झाल्यामुळे, इथल्या मातीतला दगड दगड हिरवा आहे. इंद्रायणी तांदळाचा भात आपण सगळ्या आवडीने खातो. इंद्रायणी तांदळाच्या भाताची शेती कशी असते कशी करतात हे बघायला मिळाले. केळीची झाडे ही काही दिसली. पण तिथल्या शेतकऱ्यांनी ती रान केळी असल्याचे सांगितले. कोटलिंगेश्वर मंदिराचे शिरगाव येथे दर्शन घेतले. हे मंदिर भोरगिरी किल्ल्याच्या पायथ्याशी आहे. ही सगळी निसर्गाची जादू, निसर्गाचे चमत्कार इको फ्रेंडली ग्रुपने आयोजित केलेल्या या ट्रेकमुळे पाहता आले. सोलापूरपासून फार लांब नाही, सगळ्या सोलापूरकरांनी किंबहुना सगळ्यांनीच भीमाशंकराचे दर्शन जरूर घ्यावे. पण परिसरातील निसर्गाचे भव्य रूप नक्कीच पहावे. प्रत्यक्ष या स्थळाला भेट दिल्यानंतरच मातीतून गाणाऱ्या चैतन्याची अनुभूती तुम्हाला मिळेल. तसेच अनेक निसर्गप्रेमी मित्रांची मैत्री तुम्हाला कायम चैतन्य देत राहील.




श्रीधर खेडगीकर

सोलापूर

९४२३५३६०८४


---

## साहित्यात सोलापूरच्या महिलांच योगदान

**सोलापूर शहरातल्या साहित्य विश्वाचा विचार केला असता सोलापूर ही साहित्य रत्नाची खाण हे लक्षात येते. कारण या शहराने एकापेक्षा एक श्रेष्ठ अशा साहित्यिकांना जन्म दिला आहे. संत-साहित्य, शाहिरी, भारुड, काव्य, कांदबरी, समिक्षा, कथा, लेख, विनोद, प्रवासवर्णन, अनुवाद अशा विविध साहित्य माध्यमांतून या शहराने मराठी संस्कृतीला व महाराष्ट्राला सतत नवे काहीतरी दिले आहे. सीमावर्ती भागात असल्यामुळे व शहरात तेलुगु भाषिकांची मोठी संख्या असल्यामुळे कन्नड व तेलुगु या दोन्ही भाषांनाही सोलापुरने स्थान दिले आहे. सोलापूर नगरीने मराठी सारस्वताला एकापेक्षा एक असे दर्जेदार कवी-कवयित्री दिले आहेत. काव्यनिर्मितीला शहरात अजूनही अनुकूल वातावरण आहे. काव्यलेखन आणि काव्यमैफीलीने शहरातले अनेक ताज्या दमाचे कवी या शहरात कीर्ती बुलंद करीत आहेत. अशी सोलापूरची ओळख आहे.**

जन्माने सोलापूरचे असलेले महाराष्ट्र साहित्यिक व सांस्कृतिक इतिहासात स्वतःच्या कर्तृत्वाने वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या मान्यवर जेष्ठ साहित्यिक आहेत. स्वर्गीय डॉ. श्रीमती जगदेवी ताई लिगाडे यांची मातृभाषा कन्नड असूनही त्यांनी मराठी व कन्नड या दोन्ही भाषांत प्रचंड वाक्य निर्मिती केली. कर्नाटक महाविद्यालयाने त्यांना १९७१ मध्ये डी. लिट पदवी बहाल केली. म्हैसूर राज्य साहित्य आणि ललितकला ॲकॅडमीकडून त्यांचा गौरव है। साहित्यलेखनाबद्दल झाला. कै. श्रीमती शांता माधव कविता, लेख यांचे विपुल लेखन त्यांनी केले. कै. शशीकलाताई साळगांवकर यांचा शेवटचा 'ममता' हा काव्यसंग्रह खूपच वाचकप्रिय झाला. श्रीमती सुरेखाताई शहा ह्या 'जोहड' या कांदबरीमुळे महाराष्ट्रभर कीर्तीवंत झाल्या आहेत. जोहड कांदबरीच्या विविध भाषेतून आवृत्या निघून त्यावर चित्रपट निर्मिती झाली. सौ. सुनेत्राताई पंडीत यांनी 'सहज सुचलं म्हणून' या सदराचे तसेच 'बसल्या बसल्या म्हणून' या कथासंग्रहाने वाचकांची मने जिंकली श्रीमती सुमनताई झाडबुके, सिंधुताई टिळक, मोहिनी पिटके, मेधा भोसेकर, श्रीमती शोभा देशपांडे, जयश्री लाटकर, शशीकला उत्पात, सिंधु टिळक, सीमा पाटील, उषा तुपकर, प्रविणा कुसूरकर, मयुरी शहा अशा अनेक जेष्ठ लेखिका, कवयित्रींनी आपल्या साहित्य लेखनाने सोलापूरांत, महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त केला.

सध्याच्या काळांतही स्त्री साहित्याची परंपरा जोपासणाऱ्या मान्यवर लेखिका कवयित्री आपल्या लेखणीतून ठसा उमटवित आहेत. कु. लता अध्यापक, शांता क्षिरसागर, जयश्री लाटकर, निर्मला मठपती, वंदना कुलकर्णी, प्रज्ञा निंबाळकर, शारदा तालिकोटी, रेणुका बुधारम, अस्मिता गायकवाड, वैशाली अघोर, कविता मुरुमकर, डॉ. श्रुतिश्री वडकबाळकर, डॉ. नसिमाताई पठाण, वैशाली गुंड, सुषमा हिरेकेरुर, निर्मला मुशन, माधुरी शहा, अंजली श्रीवास्तव, डॉ. अंजली कदम, सौ. स्मिता पाटील, नयना कोठाडिया, शैलशिल्पा जाधव,आशा पाटील, सौ. दुर्गा जोशी, पंचशीला कांबळे, सौ. आरती काळे, डॉ. लता अकलुजकर, रेखा शहा, विशाखा काळे. विद्या कलकर्णी स्वाती कराले विद्याकालेश बोल्ली, मृद्ट्रा गोखले आशालता जगताप, सुलभा दहिहंडे, पार्वती घाडगे, कमलादेवी आवटे, सुमन उज्वला साळखे, पुष्पा गायकवाड, पुष्पा आगरकर अशा चंद्रशेखर, ॲड, अपर्णा रामतीर्थकर, सरिता मोकाशी, अनेक लेखिका-कवयित्री विविध वृत्तपत्रे, दिवाळी अंक, नाट्यलेखनातून, पुस्तके लिहून सोलापूरचे नावलौकिक अजरामर करण्याचा आपआपल्या परीने प्रयत्नशील आहेत.




साहित्याने समाज घडवावा, साहित्याने संस्कृती जतन करावी. लेखिका-कवयित्रींनी आपले साहित्य समाजापुढे केवळ एक प्रमाण म्हणून न येता साहित्य समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. साहित्य समाजाचा 'आरसा' आहे. हित साधणारे असे साहित्य विचार प्रवृत्त करणारे ठरावे. साहित्य आणि समाज यांचे अतुट नाते असते. पूर्वीच्या लेखन शैलीचे वाचन सध्याच्या परिस्थितीवर परिणाम करणारे प्रभावी लेखन करावे. आज सर्वत्र अत्याचार, हुंडाबळी, भ्रूणहत्या, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, महिलांवरील बलात्कार, महिला संरक्षण, शिक्षणाचा, संस्काराचा अभाव, प्रसार माध्यमांचे अनुकरण, माणसातल्या माणुसकीचा अभाव, दया, क्षमा, यांचा अभाव, मोबाईलचा दुष्परिणाम, वाढती महागाई, वैचारिक दृष्टी, अज्ञान, आर्थिक उधळण, समाजातील अराजकता, जातीभेद अशा अनेक गोष्टी आपल्या लेखणीतून मांडून ज्वलंत प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर साहित्य दिशा देणारे ठरेल साहित्यामध्ये प्रचंड ताकद आहे. आपली लेखनी धारधार व प्रभावी असावी. एवढीच श्री सरस्वतीचरणी प्रार्थना !




शोभना सागर

ज्येष्ठ लेखिका, सोलापूर

९२२५८३८८९५





दै.तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



- शुभेच्छुक -

## के.पी. क्रिकेट अकादमी

स्थळ : हरिभाई देवकरण प्रशाला क्रीडांगण, सोलापूर
वेळ : सकाळी ६.३० ते ९ व दुपारी ४ ते ७

मुख्य प्रशिक्षक : प्रकाश कंपली
मो.९६७३१५०९०९
सहाय्यक प्रशिक्षक : समीर वजीरकर,
चंद्रकांत जाधव, सुरज गायकवाड, ऐश्वर्या गिरे





तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

## जापनीज शोतोकान कराटे सेल्फ -डिफेन्स क्लासेस

मुख्य शाखा - कर्णिक नगर हॉल, पावन गणपती मंदिरजवळ, कॉलेजमागे
शाखा - लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेट हायस्कूल, सोलापूर

- मुख्य कराटे प्रशिक्षिका व आंतरराष्ट्रीय पंच -
शिहान कु. अनुराधा महादेव थोरात
(ब्लॅक बेल्ट ५ डिग्री)
मो. ९८२२२०६४३०



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



श्री. श्रीकांत ढेपे
शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते खो-खो संघटक



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

PUSHP CRICKET ACADEMY

## पुष्प क्रिकेट अकॅडमी

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, सोलापूर

अध्यक्ष: प्रदीप गायकवाड
प्रशिक्षक: उदय डोके

प्रशिक्षण वेळ :
सकाळी ६.३० ते ९
संपर्क : ९८२३६२४५२२



तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -
अरुणकुमार बा. धुमाळ
आणि परिवार, सोलापूर.





सोलापूर तरुण भारत

४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

## एक शुभचिंतक





तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

## २५ वर्षापासून

कार्यरत असलेले विश्वसनीय
कौस्तुभ ब्राम्हण वधुवर सूचक केंद्र



द्वारा :
रविंद्र नाशिककर
पत्रकार
११४/१० डॉ. गोगटे चाळ,
मुरारजी पेठ सोलापूर
मो. ९३७२१०२४७७
वेळ : सायंकाळी ६ ते ८



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

BSC BHANDARI SPORTS CLUB

## भंडारी स्पोर्टस् क्लब

जुळे सोलापूर

प्रवीण भंडारी - अध्यक्ष | महेश भंडारी - उपाध्यक्ष | साहिल भंडारी - सचिव
वृषभ भंडारी - कार्यसचिव | शिवा अकलूजकर - संचालक

क्रिकेट व फुटबॉलच्या प्रशिक्षण शिबिरासाठी संपर्क : ९८८१७८६५७८
सकाळी ६ ते ९ सायंकाळी ४ ते ६

प्रशिक्षक - क्रिकेट : किरण दिघे, अमर पाटील, अनिल सलगर, साक्षी मरेड्डी, ऐश्वर्या, गौरी, सीमा.

फुटबॉल : स्वप्नील रजपूत, अजय



तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!



## शिवलीला स्पोर्टस्

कराटे अँड योगा असोसिएशन

स्व. संरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण काळाची गरज हे ब्रीदवाक्य घेऊन २०१३ पासून गुरुवर्य योगाचार्य कै.सुरेश जाधव (सर) यांच्या आशीर्वादाने अत्यंत माफक दरात व गरजूवंत मुलींकरिता मोफत प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे.

प्रशिक्षक : सेनसाई शिवशरण वाणीपरीट    संस्था सचिव : स्मिता वाणीपरीट

प्रशिक्षण : योगाधारित कराटे व किक बॉक्सिंग, लाठीकाठी व कलरीपयत पध्दतीचे प्रशिक्षण

मुख्य शाखा : दमाणी नगर येथील सद्गुरु बाजी आण्णा महाराज मठ, प्रतिक्षा बंगलोज, जानकर नगर, सोलापूर
शाखा १ : इंद्रधनू टेनिस कोर्ट, मरिआई चौक, सोलापूर
शाखा २ : मनोहर सांस्कृतिक भवन, अवंती नगर, सोलापूर

प्रशिक्षण वेळ : दररोज सायं. ६.३० ते ७.३० संपर्क ९८२२९३३१०५/८०८७७७३८११



सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

सबको सन्मती दे भगवान

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ सोलापूर संचलित,

## श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल

शिवगंगा नगर भाग ५, कुमठा नाका, सोलापूर.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ मध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यात द्वितीय क्रमांक

शाळेची वैशिष्ट्ये

१) पाचवी ते दहावी सेमी इंग्रजी वर्ग.
२) सर्व वर्ग डिजिटल.
३) भव्य सांस्कृतिक भवन
४) स्वतंत्र संगणक (आयसीटी लॅब) कक्ष.
५) इयत्ता १० वी यशस्वी निकालाची परंपरा कायम.
६) सुसज्ज प्रयोगशाळा
७) प्रशस्त ग्रंथालय,
८) विद्यार्थ्यांसाठी फिल्टर पाणी.
९) भव्य क्रीडांगण.
१०) आकर्षक परसबाग.

मुख्याध्यापक : श्री. रमेश युवराज यादवाड.
सर्व शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी.



दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा.

स्थापना - १९८९

।। तमसोमा ज्योतिर्गमय ।।

मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर
श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा
श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय

हत्तुरे नगर, होटगी रोड, सोलापूर-४१३२२४

- शुभेच्छुक -
मुख्याध्यापक,
शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद




## लोकनेते स्व. बाबुराव आण्णा पाटील यांना विनम्र अभिवादन !

### मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, मोहोळ

ता. मोहोळ जि. सोलापूर ४१३ २१३ फोन नं. २३२२९४, २३२१००

अनगर शाखा | बेगमपूर शाखा | पेनूर शाखा | पाटकुल शाखा | कुरुल शाखा | शिरापूर सो. शाखा | अंजनगाव (खे)

माजी आमदार श्री. राजन बाबुराव पाटील यांचे समर्थ नेतृत्वाखाली सतत प्रगतीपथाकडे वाटचाल करणारी जिल्हयातील अग्रणी पतसंस्था

**✻ सांपत्तिक परिस्थिती✻**

| | | | |
|---|---|---|---|
| १) सभासद संख्या | ४०१४ | २) सभासद भागभांडवल | रु. ६७.८७ लाख |
| ३) ठेवी | रु. १७०.७० कोटी | ४) कर्जे | रु. १६८.२३ कोटी |
| ५) गंगाजळी व इतर निधी | रु. ५४.४१ कोटी | ६) गुंतवणुक | रु. ५६.०६ कोटी |
| ७) नफा | रु. ४.६१ कोटी | | |

**- संस्थेची वैशिष्टये -**

१) सोनेतारण, मशिनरी तारण, वाहनतारण, बांधकाम, सभासद जामीनकी, इत्यादी प्रकारचे कर्जाची सोय. २) सर्व प्रकारच्या कर्जावर १२ टक्के सरळव्याज पध्दतीने व्याजदर. ३) सोने तारण कर्ज १० ग्रॅम चोख सोन्यावर ५५००० व्याजदर १०.५० टक्के ४) सेफ डिपॉझीट लॉकर्सची सोय ५) आरटीजीएस, एनईएफटी, एसएमएस बँकिंग सुविधा ६) मोहोळ शहरातील विद्युत ग्राहकांचे बिल स्वीकारणेची सोय ७) पूर्ण संगणकीकृत सीबीएस प्रणाली. ८) शाखा विस्तार अनगर, बेगमपुर, पेनुर, पाटकुल, कुरुल शिरापुर. सो. अंजनगाव (खे), पापरी

संस्थापक



लोकनेते बाबुराव आण्णा पाटील

| मुस्ताक अ. खाजुलाल शेख | प्रमोद मोहोन डोके | डॉ. कौशिक संदिपान गायकवाड |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

**✻ संचालक मंडळ ✻**

मा.आ. राजन पाटील, श्री. सतिश भोसले, श्री. जगन्नाथ कोल्हाळ, श्री. बाजीराव जोशी श्री. शहाजी गुंड, श्री. सचिन फाटे, श्री. ईस्माइल तांबोळी, श्री. रमेश देशमाने, श्री. तानाजी रोहीटे, श्री. चंद्रकांत वाघमोडे, श्री. सचिन चव्हाण, श्रीमती. रंभादेवी गुंड, श्रीमती कीर्ती देशपांडे व कर्मचारी वृंद

**मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था मर्यादित**
**मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापुर**

---

## ।। विनम्र अभिवादन ।।



मोहोळचे माजी आमदार, सहकारातील जाणते नेते, गोरगरीबांचे आधारस्तंभ, लोकनेते

**स्व.बाबुराव (आण्णा) पाटील अनगरकर**

यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !



**दै.सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...**



✻ सौजन्य :-

**कुंदन तथा रुपेश धोत्रे**
शहराध्यक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मोहोळ शहर
समस्त कार्यकर्ते हितचिंतक
व मतदार बंधूभगिनी

---

## विनम्र अभिवादन! विनम्र अभिवादन! विनम्र अभिवादन!

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मी मिळवणारच असे ठणकावून सांगणारे
**लोकमान्य टिळक**
दीनदलित, दुबळ्यांच्या उन्नतीसाठी सातत्याने संघर्ष करणारे, श्रमिकांचे कैवारी, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे असे ठासून सांगणारे
**लोकशाहीर आण्णाभाऊ साठे**
आणि ब्रिटीशांच्या अन्यायाविरुद्ध लोकलढा उभारुन गोरगरिबांसाठी बाजार खुला करणारे झुंजार नेतृत्त्व
**लोकनेते माजी आमदार स्व. बाबुराव आण्णा पाटील**
**यांना विनम्र अभिवादन**







अभिवादक

## छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळ
अनगर तालुका मोहोळ, जिल्हा सोलापूर

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

**महाराष्ट्राला गड किल्ल्यांचा वैभवशाली परंपरा आहे इथल्या दगड धोंड्यांना प्रेरणादायी इतिहास आहे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या महाराष्ट्राच्या भूमीत ऐतिहासिक इतिहासाचा साक्षीदार असलेला अभेद्य व भक्कम असा किल्ला धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग येथे आहे , सोलापूर पासून अवघ्या ४५ किमी. हैद्राबाद हायवेवर नळदुर्ग हे शहर निजामकालीन जिल्हा आहे, या शहरात हिंदू, मुस्लिम एकत्रित गुण्या गोविंदाने राहतात, अशा या शहरात हा किल्ला आसून, महाराष्ट्रातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला म्हणून नळदूर्ग किल्ल्याचा उल्लेख होतो जवळपास १२५ एकरामध्ये हा किल्ला आहे ऐतिहासिक व धार्मिक या दोन्ही क्षेत्रांमध्ये या किल्ल्याचा उल्लेख आढळतो. मुघलशाही ,कुतुबशाही ,निजामशाही, आदिलशाही आणि मराठीशाही या सर्व राज्यसत्ता मध्ये या किल्ल्याचा इतिहास आढळतो. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी एकच मार्ग आहे किल्ल्याच्या तिन्ही भागाला मोठे खंदक आहे बोरी नदीचे पाणी वळवून किल्ल्याला संरक्षण देण्यात आले आहे..**



# जाज्वल्य इतिहासाचा साक्षीदार नळदूर्गचा किल्ला

हुलमुख दरवाजा- किल्ल्याच्या प्रवेशद्वाराला हुलमुख दरवाजा असे म्हणतात हूल म्हणजे हुलकावणी देणे नवीन माणसाला किल्ल्यात प्रवेश करताना किल्ल्याचा नेमका प्रवेशद्वार कोणता हे लवकर समजू नये अशा पद्धतीने या प्रवेशद्वाराची निर्मिती करण्यात आली आहे आत मध्ये प्रवेश करताना आपल्याला एक लाकडी दरवाजा दिसतो हा दरवाजा अतिशय भव्य आणि भक्कम आहे दरवाज्याची उंची २० फूट असून रुंदी सात ते आठ फूट आहे शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी हा दरवाजा बनविण्यात आला होता, दरवाजाच्या अनेक ठिकाणी मोठमोठे खिळे मारण्यात आलेले आहेत हूलमूक दरवाजातून आत मध्ये प्रवेश केल्यानंतर आपल्याला किल्ल्याची भव्यता दिसते एका नजरेमध्ये हा किल्ला आपल्याला सामावता येत नाही नळदूर्ग किल्ल्याला बुरुजांचा किल्ला असे म्हटले जाते एकूण ११४ बुरुज या किल्ल्याला आहेत यामध्ये तूर्या, संग्राम, फतेह, परंडा अशा अनेक नावाची बुरुज आहेत पण यामध्ये सर्वात आकर्षण म्हणजे उपल्या बुरुज

हूलमुख दरवाजातून मध्ये गेल्यानंतर उजव्या हाताला एक आयताकृती इमारत आहेत याला अंबरखाना म्हणतात आणि यालाच हत्ती खाना असेही म्हणतात, येथे एका मोठ्या शिळावर हत्ती कोरण्यात आला आहे त्यानंतर आपल्याला दिसते एक सुंदर इमारत ज्याला मुन्सिफ कोर्ट म्हणून ओळखले जाते १९३२ साली निजाम राजवटीच्या काळात ही इमारत बांधण्यात आली. या ठिकाणी निजामाची कोर्ट होते आणि या या ठिकाणावरून न्यायनिवाडा करण्यात येत असे..


मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्मे हुतात्मा बाबूराव बोरगावकर हे याच मुन्सिफ कोर्टामध्ये वकील होते तर हुतात्मा निलय्या स्वामी हे मुनिम होते..

मुन्सिफ कोर्टाच्या थोडे पुढे गेल्यावर किल्यातील सर्वात थंड असलेली इमारत महाल आपल्या दृष्टीस पडेल त्याचे नाव बारादरी असे आहे.. या महालाला एकूण १२ दरवाजे होते म्हणून त्याला बारादरी असे म्हटले जाते. वास्तूकलेच्या दृष्टीने ही इमारत उल्लेखनीय आहे.. मुख्य इमारत अतिशय थंड असून आदिलशाह निजामशाह यांचा परिवार येथे विश्रांतीसाठी येत असे.. या इमारतीच्या पाठीमागे बालकनी असल्यासारखे आहे.. या ठिकाणावरून बोरी नदीचे मनमोहक रूप पाहायला मिळते...

या महालाच्या बाजूला आणखीन एक मुख्य इमारत आहे त्याला रंगमहाल नाव आहे याच्याच बाजूला दरबार महाल आहे.. हा दरबार महाल उत्तराभीमुख असून त्याला २४ खांब व ५ कमानि आहेत..

उपल्या बुरुज -

नळदुर्ग किल्ल्यातील पर्यटकासाठी सर्वात महत्त्वाचे ठिकाण म्हणजे उपल्या बुरुज.. हा बुरुज किल्ल्याच्या मध्यभागी उभा आहे.. हे किल्ल्यातील सर्वात उंच ठिकाण असून यावरून संपूर्ण किल्ला आणि परिसरावर लक्ष ठेवता येत असे.. या उपल्या



बुरुजाला एकूण ७७ पायऱ्या आहेत.. पहिला टप्पा ३१ पायऱ्या चा तर दुसरा टप्पा ३४ पायऱ्याचा आणि तिसरा टप्पा बारा पायऱ्याचा यात बुर्जावर मोठ-मोठे तोफा ठेवण्यात येत होत्या म्हणे , बुर्जाच्या पाठीमागे दोन मोठे पाण्याचे तलाव आपणास पहावयाला मिळते. बुरुज चढताना मध्यभागी एक दहा बाय दहाची खोली आहे ही खोली आराम खोली म्हणून ओळखली जाते

नऊ बुरुज - उपल्या बुरजानंतर किल्ल्यातील महत्त्वाचे ठिकाण म्हणजे नऊ बुरुज या बुरुजाला नऊ पाकळ्यांचा बुरुज म्हणतात प्रत्येक पाकळी मध्ये स्वतंत्र खिडकी आहे या बुरुजावरून किल्ल्याचा बाहेरचा भाग संपूर्णपणे दृष्टिक्षेपात येतो यावरून संपूर्ण परिसरावर नजर ठेवता येते

पाणी महाल -

नळदुर्ग किल्ल्यातील सर्वात प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय स्थळ म्हणजे पाणी महाल अर्थात नर्मदी धबधबा महाराष्ट्र सह संपूर्ण देशातील लाखो पर्यटकांचा हा आवडता पर्यटन क्षेत्र आहे पाणी महाराची बांधणी १६१३ मध्ये आदिलशहाच्या काळात इब्राहिम आदिलशाही दुसरा यांनी बांधलेला आहे हा पाणी महाल वास्तुशास्त्राचा अत्यंत सुंदर आणि उत्कृष्ट असा नमुना आहे मिर मोहम्मद इमदिन या वास्तुशास्त्रज्ञाने या पाणीमहालाची बांधणी केली आहे किल्ल्यातून वाहत जाणारी बोरी नदी ही अडवण्यात आली आणि त्यावर एक धरण बांधण्यात आले हे नुसते धरण नसून या धरणाच्या मध्यभागी एक सुंदर महाल बांधण्यात आला यालाच पाणी महाल असे म्हणतात या महालात बसून नयनरम्य दृश्य आपणास पहावयास मिळते पाणीमालाच्या दोन्ही बाजूला दोन सांडवे या ठिकाणी आहेत पावसाळ्यामध्ये जेव्हा पाऊस जास्त पडतो तेव्हा आढळून आले पाणी या सांडव्यातून



बाहेर पडते यालाच जगप्रसिद्ध नरमादी धबधबा असे म्हटले जाते.. हा धबधबा जमिनीपासून जवळपास ९० फूट इतका उंच आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे या धबधब्यातून पडणारे पाणी एका धबधबातून पांढरे शुभ्र पाणी बाहेर पडते तर दुसऱ्या धबधबातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा रंग थोडासा हिरवा असतो..

खरंतर या नळदुर्ग किल्ल्याला एक खूप मोठा प्राचीन धार्मिक इतिहास सुद्धा आहे हा किल्ला सुरुवातीच्या काळामध्ये रणमंडळ या नावाने ओळखला जायचा किल्ला सुरुवातीला संपूर्ण मातीचा होता चालुक्याच्या काळामध्ये इसवीसन ५३७ स*** राजा नळपती तिसरा यांनी बांधण्याचा उल्लेख आहे तालुक्यानंतर बहमनी सत्ता येथे निर्माण झाली त्यांच्या काळामध्ये नजर किल्ल्याचे दगडी



**विनायक अहंकारी**

**माजी नगरसेवक, नळदुर्ग**

**७३५०५३२८३४**

बांधकाम त रूपांतर करण्यात आले इसवी सन १४८१ स*** विजापूरच्या आदिलशहाने हा किल्ला जिंकला नंतर मोगल काळामध्ये साधारणपणे इसवी सन १५५८ मध्ये दगडी बांधकामा सुरुवात झाली. पुढे बोरी नदीवर बंधारा बांधून रणमंडळ व नळदूर्ग हे दोन वेगवेगळे किल्ले एकत्र करण्यात आले १६७६ स*** औरंगजेबाने हा किल्ला जिंकल्याचे उल्लेख आहे त्याचबरोबर १७५८ स*** झालेल्या सिंदखेडच्या तहामध्ये पेशव्यांनी हा किल्ला जिंकल्याचा उल्लेख आहे त्यामुळे हा किल्ला काही काळासाठी मराठाशाहीच्या वतनाखाली होता त्यानंतर हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला परंतु १८५८ स*** झालेल्या उठावाच्या वेळेस निजामाने इंग्रजांना मदत केली होती आणि या मदतीची परतफेड म्हणून इंग्रजांनी हा किल्ला पुन्हा निजाम ाच्या स्वाधीन केला स्वाधीन करताना नळदुर्ग आणि रायचूर हे दोन वेगवेगळे जिल्हे निजामाच्या ताब्यात देण्यात आले. पुढे निजाम काळामध्ये हा किल्ला अनेक वर्ष होता १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला परंतु नळदुर्ग किल्ला हा निजामाच्या राजवटीखाली असल्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ स*** निजामाच्या विरोधात झालेल्या सैनिकी कारवाईनंतर निजाम शरण आला आणि मराठवाडा नळदुर्ग हे भारत देशामध्ये सामील झाले आजही १५ ऑगस्ट २६ जानेवारी एक मे आणि १७ सप्टेंबर या राष्ट्रीय सणाच्या दिवशी नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यावर भारताचा तिरंगा ध्वज फडकवण्यात येतो यावेळी शहरातील सर्व नागरिक व सर्व शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने झेंडावंदनासाठी किल्ल्यामध्ये उपस्थित राहतात नळदुर्ग चा किल्ला हा इतिहास धार्मिक पर्यटन निसर्ग या सर्व क्षेत्रांमध्ये अत्यंत सुंदर आणि प्रसिद्ध असा हा किल्ला आहे, अक्कलकोटचे समर्थ,गाणगापूर चे श्री दत्त, पंढरीचा विठोबा यांच्या पासून जवळच हा किल्ला असून,या किल्ल्याच्या कुशीत,

त्यालगतच वसलेले एक फार मोठे, सुंदर रिसॉर्ट असून त्याचे नाव,युनिवंडर्स रिसॉर्ट अँड थीम पार्क, हे आहे त्या मध्ये कुटुंबासह निवासाची उत्तम सोय असून त्या मध्ये मनोरंजनासाठी विविध खेळ


महिलांसाठी व मुलांसाठी सुरक्षित वातावरण

टेंट हाऊस,किड्स प्ले झोन

स्विमिंग पूल,रॉकेट इजेक्टर,ह्युमन गायरो,

रोप कोर्स, वॉल क्लाइंबिंग, बोटिंग अनुभव निसर्गाचा आनंद घ्यावा, पर्यटक भक्त भाविकांनी या किल्ल्याला एक वेळ अवश्य भेट द्यावी हीच भावना या प्रसंगी व्यक्त करतो.

**शब्दांकन- अजय अणदूरकर**
**पत्रकार दै.तरुण भारत अणदूर**








# बुद्धीमान, सामर्थ्यवान...

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज महाराष्ट्रातील सर्वोच्च नेते आहेत. ते मुख्यमंत्री असल्याने स्वाभाविकपणे सर्वोच्च पदावर आहेत. पण त्यापेक्षाही त्यांनी गेल्या अकरा वर्षात ज्या प्रकारे आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे, त्यामुळे ते सामर्थ्यवान नेते झाले आहेत. बुद्धीमत्ता, कठोर परीश्रम, विचारांवरील अविचल निष्ठा आणि जिद्द ही मा. देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या जोरावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे.**

मा. देवेंद्रजींनी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मुंबईत वानखेडे स्टेडियमवर नव्या मंत्रिमंडळाचा देखणा शपथविधी झाला होता. विराट जनसागर लोटला होता. राज्याच्या इतिहासात प्रथमच भाजपाचा मुख्यमंत्री झाला होता. जनतेमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये कौतुक होते. केवळ ४४ व्या वर्षी मुख्यमंत्री झालेल्या देवेंद्रजींकडून महाराष्ट्राला अपेक्षा होत्या. त्यावेळी ते भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष होते. त्यांच्याच नेतृत्वात राज्यात पक्षाने विधानसभा निवडणूक लढविली होती. ऐन निवडणुकीत भाजपाची शिवसेनेबरोबरची युती तुटली होती. काही महिन्यांपूर्वीच लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे निधन झाले होते. सर्व बाजूंनी आव्हाने होती. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर भरवसा ठेऊन देवेंद्रजींनी पक्षाचे नेतृत्व केले आणि भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून विजयी झाला. भाजपाचे सरकार सत्तेवर आले.

मा. देवेंद्रजींनी सरकार स्थापन केले तरी अनेक आव्हाने होती. मुळात स्वतः देवेंद्रजींना मंत्रिपदाचा अनुभव नसताना ते थेट मुख्यमंत्री झाले होते. मंत्रिमंडळातही एकदोन अपवाद वगळता सर्वजण प्रथमच मंत्री झाले होते. बहुमतासाठी १४५ जागांची आवश्यकता असताना भाजपाकडे १२२ जागा होत्या. नंतर शिवसेना सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर बहुमताचा प्रश्न निर्णायकपणे संपला. १९९९ ते २०१४ या पंधरा वर्षांच्या कालावधीत राज्यात काँग्रेसच्या नेतृत्वातील आघाडी सरकार होते. या काळात राज्याची इतकी वाताहत झाली होती की, कोठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा ? असा प्रश्न जनता विचारत होती. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जनतेने भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत देऊन त्यांच्यावर पूर्ण विश्वास व्यक्त केला होता. त्यांच्याच पद्धतीने महाराष्ट्राचे नवे सरकार चालावे अशी अपेक्षा होती. स्वतः देवेंद्रजींनी राज्याच्या विकासासाठी सविस्तर व्हिजन डॉक्युमेंट तयार केले होते. राज्याचा आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय, महाराष्ट्राचा महान वारसा अशा अनेक बाबींचा त्यात विचार केला होता. राज्याच्या कल्याणासाठीची अनेक स्वप्ने उराशी बाळगून देवेंद्रजींनी सरकार स्थापन केले होते.

सरकार चालवायचे तर सरकारी यंत्रणेकडून काम करून घ्यायला हवे. तेथेच समस्या होती. काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात पंधरा वर्षात राज्याची प्रशासकीयदृष्ट्या इतकी घसरण झाली होती की, अधिकारी आणि कर्मचारी आपण जनतेचे सेवक आहोत, हेच विसरून गेले होते. विकासाचे मोठे प्रकल्प राबविणे दूर राहिले, त्यांना दैनंदिन कामाचेही ओझे वाटू लागले होते. काँग्रेसची भूमिका जैसे थे होती आणि सरकारी यंत्रणेलाही तीच सवय लागली होती. शक्यतो काही करायचे नाही, अगदीच नाईलाज झाला तर जेमतेम काम करून भागवून न्यायचे, अशी मानसिकता बनली होती. दुसरीकडे देवेंद्रजींनी आपल्या उत्साही सहकारी मंत्र्यांच्या साथीने कामाचा धडाका लावला होता. महाराष्ट्राला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठीची जलयुक्त शिवार योजना, विदर्भ - मराठवाडा - उत्तर महाराष्ट्राला मुंबईशी जोडणारा समृद्धी महामार्ग असे अनेक उपक्रम देवेंद्रजी सुरू करत होते. पण नोकरशाहीचे मात्र अपेक्षित सहकार्य मिळत नव्हते. अधिकाऱ्यांच्या नकारात्मक मानसिकतेबद्दल देवेंद्रजींनी एकदा जाहीरपणे खंत व्यक्त केली होती.



**विश्वास पाठक**

**लेखक भाजपाचे प्रवक्ते आहेत.**

परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी हाती घेतलेले काम सोडायचे नाही, हा देवेंद्रजींचा स्वभाव आहे. त्यानुसार त्यांनी राज्याच्या प्रशासनावरही ठामपणे पकड घेण्यासाठी काम सुरू केले. काही काळातच त्यांना यश आले. त्यांच्या विकास अभियानात अडथळे आणणारे अधिकारी आता धाकाने म्हणा किंवा आणि कशाने म्हणा, पण सहकार्य करू लागले. देवेंद्रजींना मुख्यमंत्री होण्यापूर्वी मंत्रिपदाचा अनुभव नव्हता, पण जीव ओतून काम करण्याची त्यांची शैली त्यांना उपयुक्त ठरली. राज्य कारभाराबद्दलचा कोणताही विषय असला तरी त्यामध्ये रस घेऊन काम करण्यामुळे देवेंद्रजींना अल्पावधीतच कामाचा पक्का अंदाज आला. विधिमंडळात उत्तरे देण्यासाठी त्यांना फारसे ब्रिफिंग करावे लागत नाही, आपल्यापेक्षा त्यांनाच विषयाची अधिक माहिती असते, असे अधिकाऱ्यांना अनुभवाने जाणवू लागले. आपल्या नेत्याची दिशाभूल करता येत नाही, उलट नेताच आपल्या चुका नेमकेपणाने दाखवून देत आहे, असे अधिकाऱ्यांना ध्यानात आले. सरकारी यंत्रणेचा दृष्टीकोन बदलला. आपल्याला काम करण्याशिवाय गत्यंतर नाही, हे त्यांच्याही ध्यानात आले. त्यानंतर देवेंद्रजींनी सरकारी यंत्रणेवर अशी काही पकड घेतली की, जनतेच्या हितासाठी ते प्रशासन हुकमी पद्धतीने चालवू लागले.

अनेक अडचणी असूनही देवेंद्रजींना त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या २०१४ ते २०१९ या पहिल्या कारकिर्दीत अविश्वनीय कामे केली. दहा पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ असलेली राज्यातील विजेच्या लोडशेडिंगची समस्या त्यांच्या सरकारने सोडविली. २०१६ साली महाराष्ट्र प्रथमच लोडशेडिंगमुक्त झाला. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक गुंतवणुकीचे राज्य बनले. मराठा समाजाला आरक्षण दिले व ते उच्च न्यायालयात टिकविले. सरकारच्या अनेक सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्या. नागपूर, पुणे येथे मेट्रोच्या कामाने गती घेतली. कामांची यादी मोठी आहे. त्यामुळेच जनतेने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मा. देवेंद्रजींच्या नेतृत्वात भाजपा महायुतीला १६१ जागांसह पूर्ण बहुमत दिले. १९८५ नंतर सुमारे ३४ वर्षांनी राज्यात एखाद्या पक्षाला किंवा निवडणूकपूर्व युतीला पूर्ण बहुमत मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्रजींवर टाकलेला विश्वास सार्थ ठरला. मा. देवेंद्रजींनी २०१९ ची विधानसभा निवडणूक जिंकली खरी पण उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लोभाने विश्वासघात केला आणि भाजपा सत्तेबाहेर फेकली गेली. भाजपाला निवडणूक जिंकूनही विरोधी पक्ष व्हावे लागले. देवेंद्रजी विरोधी पक्षनेते झाले. डिसेंबर २०१९ ते जून २०२२ या अडीच वर्षांच्या कालावधीत देवेंद्रजींचे विरोधी पक्षनेते म्हणून जे आक्रमक रूप महाराष्ट्राने पाहिले त्यामुळे त्यांचे समर्थक आश्चर्यचकित झाले आणि विरोधकांना धडकी बसली. महाविकास आघाडी सरकारच्या अनेक भानगडी त्यांनी नाट्यपूर्ण पद्धतीने बाहेर काढल्या. राज्याचा नेता म्हणून देवेंद्रजींची जो धाक आज दिसतो त्यामध्ये त्यांच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या कारकिर्दीचा मोठा वाटा आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यानंतर दीर्घकाळाने महाराष्ट्राने आक्रमक, धाडसी आणि सत्ताधाऱ्यांना जरब बसविणारा विरोधी पक्षनेता मा. देवेंद्रजींच्या रुपाने पाहिला. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या यशस्वी उठावानंतर ३० जून २०२२ रोजी पुन्हा एकदा भाजपा शिवसेना महायुतीचे सरकार राज्यात सत्तेवर आले. २०१९ च्या जनादेशाचे सार्थक झाले. मा. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देण्याचा निर्णय झाल्यानंतर भाजपाचे १०५ आमदार असूनही मा. देवेंद्रजींनी मोठ्या मनाने हा निर्णय स्वीकारला आणि तो स्वतः जाहीर केला. देवेंद्रजींची इच्छा सरकारबाहेर राहून पक्षकार्य करण्याची होती. तथापि, केंद्रीय नेतृत्वाने आदेश दिल्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले आणि त्या भूमिकेतही प्रभावी काम करून दाखविले.

राज्यात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने ऐतिहासिक जनादेश दिला. भाजपा महायुतीचे २३५ आमदार निवडून आले. भाजपाने १४९ जागा लढवून १३२ जागा जिंकल्या. देवेंद्रजींनी ५ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि त्यांच्या नेतृत्वात नव्या सरकारचे काम सुरू झाले. यावेळचे देवेंद्रजींचे नेतृत्व २०१४ च्या तुलनेत वेगळे आहे. दहा वर्षांपूर्वी ते नवखे मुख्यमंत्री होते. राज्याचा अंदाज घेत, विकासकामांचा अजेंडा रेटत आणि राजकीय कसरती करत कारभार करत होते. त्यावेळी सुरुवातीला त्यांना नोकरशाहीच्या असहकाराचाही सामना करावा लागला. आता देवेंद्रजींचे नेतृत्व अनेक अग्निपरीक्षांमधून तावून सुलाखून निघालेले सामर्थ्यवान नेतृत्व आहे. त्यांच्याकडे २०१४ ते २०१९ या कालावधीतील मुख्यमंत्रीपदाचा अनुभव आहे. त्यांच्याकडे अडीच वर्षांच्या विरोधी पक्षनेतेपदाचा अनुभव आहे. त्यांच्याकडे अडीच वर्षांच्या उपमुख्यमंत्रिपदाचाही अनुभव आहे. दरम्यानच्या काळात त्यांनी भाजपाचे बिहार आणि गोवा विधानसभा निवडणूक प्रभारी म्हणून पक्षाला यश मिळवून दिले. त्यांच्या नेतृत्वात भाजपाने राज्यात २०१४, २०१९ आणि २०२४ अशा तीनही विधानसभा निवडणुकांत सेंच्युरी मारली आहे. त्यांच्या नेतृत्वात यापूर्वी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नेतृत्वात भाजपाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला महाराष्ट्रात अपयश आल्यानंतर त्याची नैतिक जबाबदारी घेऊन उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दाखवली. त्यांचा हा प्रामाणिकपणा आणि प्रांजळपणा जनतेला भावला.

प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव, अनेक चळवळी आणि आंदोलने हाताळणे, विरोधी पक्ष म्हणून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणे, अविश्वसनीय असे विकास प्रकल्प राबविणे, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये पक्षाने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडणे, वैयक्तिकदृष्ट्या अत्यंत हीन पातळीवरील टीकेनंतरही तोल ढळू न देणे, वर्षानुवर्षांच्या साथीदाराने विश्वासघात करणे .... कितीतरी अडचणी, आव्हाने आणि संकटांचा देवेंद्रजींनी सामना केला आहे. त्यातून त्यांचे सामर्थ्यवान नेतृत्व उभे राहिले आहे. काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी देवेंद्रजींना म्हणाले, पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर म्हणजे २०१४ ला जाहीरपणे आपण अधिकारी ऐकत नसल्याची तक्रार केली होती. मात्र आता अधिकारी फडणवीसांचे सोडून दुसरे कोणचेच ऐकत नाही, असे आम्ही ऐकतो. जयंत पाटील यांची टिप्पणी ही देवेंद्रजींच्या एकूणच कामकाजाबद्दल लागू होते. महाराष्ट्राच्या प्रशासनावरील, राजकारणावरील आणि अर्थकारणावरील देवेंद्रजींची पकड सिद्ध झाली आहे. त्यांच्या भक्कम नेतृत्वात महाराष्ट्र हे केवळ देशातील नव्हे तर जगातील अग्रेसर राज्य होवो, ही सदिच्छा.

---

# धनुर्विद्येत सोलापुरची आंतरराष्ट्रीय भरारी

**गेल्या ९ वर्षाच्या तपश्चर्येनंतर अनेक अडथळ्यानंतर कायमस्वरुपी मैदान मिळाल्यामुळे गेल्या दोन वर्षात तनिष्का ठोकळ व साईराज हानमे हे दोन आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या खेळाडू घडल्याचा त्यांना आनंद आहे. ते आहेत धनुर्विद्या प्रशिक्षक दीपक चिकणे. त्यांच्या प्रशिक्षक कारकीर्दीचे मनोगत त्यांच्याच शब्दात.**




**दिपक चिकणे**

सोलापूर

८१४९००१७१८


## पार्क स्टेडियमवर सुरवात

आठ ऑगस्ट २०१६ रोजी प्रा.संतोष गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली धनुर्धर अकॅडमी या नावावे एक छोटी धनुर्विद्या प्रशिक्षण देणारी अकादमी पार्क स्टेडियमच्या एका कोपऱ्यात सुरु केली. याला त्यावेळचे मनपाचे क्रीडा अधिकारी नजीर शेख, क्रीडा संघटक इक्बाल शेख यांचे सहकार्य मिळाले. दिवसभर मार्केटिंगचे काम आणि पहाटे व रात्री २ तास मुलांना घडवणे, अशी सुरुवात करण्यात आली. पण मार्केटिंगची कामे शहराच्या बाहेर असणार. कधी शहरात पण सरावास सुट्टी पडू नये म्हणून खुप प्रयत्न करणार. त्या वेळचे पार्क स्टेडियम म्हणजे सर्व कचऱ्याचे साम्राज्य. पालक, खेळाडू सारखे त्याबद्दल कल्पना देणार. पण आर्थिक हालातीमुळे त्यांची समजूत काढणार. आपल्याला २ तास सराव करायचं असतो मुलांना त्याची जाणीव असू द्या. अश्या परिस्थितीमध्येच खुप दिवस ग्राउंडचा शोध सुरू होता.

## ह.दे.प्रशालेचे सहकार्य

अनेक शाळेत त्याबद्दल मागणी केली. पण सर्वांची एकच मागणी आम्हाला काय फायदा याचा देणार. मुलांना घडवणे हे ठीक आहे पण शाळेला काही तरी फायदा हवा असतो. त्याच वर्षी अकादमीला जय आमले याच्यारूपाने पाहिले राष्ट्रीय पदक प्राप्त झाले. पालक डॉक्टर असल्याने त्यांच्या ओळखीने हरिभाई देवकरण येथे सरावस सुरुवात करण्यात आली. चांगले क्रीडांगण मिळाल्याने संख्या तर वाढली पण सर्वांची वेळ ही सायंकाळी ६ नंतर करावी लागली. कारण दुसऱ्या खेळाडूंना त्रास होऊ नये, अश्या अवस्थेत ॲकडमीला अक्षय काळे, नेताजी पवार, श्रेया परदेशी, तनिष्का ठोकळ, अनुज मिस्त्री, समर्थ कोलारकर, वरद घोगडे, आकांक्षा घुले, आशिष काळे, मेघना वन्नाम, दीप्ती कदम व कार्तिकी कदम असे राष्ट्रीय खेळाडू घडले. पण काही पालकांची स्वप्न लवकर सत्यात उतरवण्यासाठी त्यांनी सोलापूरमध्ये ग्राउंडच्या सुविधा नसल्याने शहर सोडून सातारा, पुणे, नगर, बुलढाणा अश्या शहरात खेळाडूंना प्रशिक्षण घेण्यास पाठवले. त्यातील काही पालकांनी विश्वास ठेऊन सराव आहे त्या परिस्थतीमध्ये सुरू ठेवला. ह.दे.प्रशालेचे पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने व शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या व्ही. एम. मेहता शाळेत पुन्हा नव्या जोमाने नवीन ग्राउंड मिळाले. तिथे सरावासाठी सुरुवात करण्यात आली. सर्व खेळाडूंना उन्हाळा हा त्या वेळी हवा असायचा. कारण तेव्हाच त्यांना सरावासाठी जास्त वेळ मिळत होता. जेव्हा शाळा सुरू होईल. तेव्हा सकाळी १० ते १ एवढा वेळ मिळणार. अश्या सरावाने श्रेया परदेशी, तनिष्का ठोकळ, जय जाधव, सुधाकर पळसे, आकांक्षा घूले, अजय मुसळे व तनिष्का जाधव या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय धनुर्विद्यासाठी पात्र ठरले. पण स्पर्धेत निवड होण्यासाठी त्या जेवढा हवा तेवढा सराव होत नाहीं म्हणून परत यामधील अनेक चांगले खेळाडू हे दुसऱ्या शहरात गेले. एवढे चांगलें खेळाडू घडवून परत असं त्यानी सोडून जावे त्यात परत कोरोना महामारीमुळे सर्व जग थांबले. त्यावेळी हे सर्व वेड सोडून द्यावे. आई वडीलांकडे आपल्या गावी बार्शीला जाऊन कुठ काम करावे म्हणून पाईप कारखाना, अश्या ठिकाणी कामे करू लागलो. पण मनात कायम रुखरुख असणार काय करायचं आपल्याला. परत आई वडीलांना सोडून जेव्हा सर्व जग सुरळीत सुरू झाले, परत तोच प्रवास सुरू झाला. परत नवीन ग्राउंडचा शोध, परत नवीन खेळाडू सर्व काही नवीन. आई वडीलांना एकुलता एक असल्याने त्यांना कायम वाटणार येथे आहे. येथेच सहा हजार पगारावर काम करून बार्शीत राहावे. कुठ परत आणखी सोलापूरला पाठवायचे पण स्वतः ला खुप कमीपणा वाटणार की असं कामं करून आयुष्य जगण्यापेक्षा न जगणे बर. न जगण्यापेक्षा परत सुरुवात करू आणि पुन्हा सुरुवात केली. परत जुन्या खेळाडूंना बोलावून घेतले त्यातील दोनच खेळाडू ज्यांनी कधी साथ सोडली नाही. श्रेया परदेशी व तनिष्का ठोकळ यांनी परत नव्याने सुरुवात केली. त्यावेळी स्वरीत धवन, सुमित ढवन, साईराज हाणामे, सिद्धार्थ साखरे, प्रगती शिंदे, यश शिंदे, रेवती शिंदे , मानवी शेलके, रेवती गवंडी, प्रेरणा हरिदास, स्वराज लोकरे, नील सुर्वे, विराज पवार यांनी २०२२ नंतर राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त केलं. यातील ६ खेळाडूंनी परत आंतरराष्ट्रीय खेळण्यासाठीचा स्कोअर प्राप्त केला. पण परिस्थिती काही बदलत नव्हती.

## जानकीनगरवरून नेहरुनगर शासकीय मैदान

जानकीनगर येथे परत नजीर शेख यांनी सरावास सुरुवात करा, असे सांगितलं. पण तेथील सोसायटीमधील लोकांना आम्ही तेथे सराव केलेल आवडले नाही. त्यानी फक्तं एक महिन्यात सर्व बंद करण्यास आम्हाला भाग पाडले. परत तो ग्राउंडचा विषय क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांना सांगितल्यावर त्यांनी पुढाकार घेऊन आमचे दुःख समजून आम्हाला नेहरूनगर येथील ग्राउंडवर सकाळी ११ ते ४ या वेळी सरावास परवानगी दिली. त्यावेळी देखील काही समाजकंटकानी त्यावेळी सर्व धनुर्विद्या साहित्य जाळले. सर्व खेळाडू हताश झाले तर सर्व काही नवीन मागवून परत तेथेच सुरुवात केली. त्यावेळेस माझ्या या सर्व धेय्य वेड्या धनुर्धरांनी कधी पाऊस पाहिला नाही, उन्हाळ्यातील ४० ते ४४ अंश सेलिसीएस असलेलं उन्ह पाहिले नाही. फक्तं एकच वेड लागले सराव करायचं आणि भारतीय संघात जागा करायची.



## क्रीडा संकुलात कायम स्वरुपी सराव

गेल्या वर्षात परत आम्ही सर्व जण सोनीपत येथे निवड चाचणीस गेलो पण हातात अपयश. तिथं जाणवले की आपले खेळाडू हे दुपारी उन किंवा पाऊस न पाहता चांगले बाण मारतात. स्पर्धेत पण सकाळी त्यांना सराव नसल्याने त्यांचे बाण हे बाहेर जातात. हे सर्व मी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, क्रीडा अधिकारी गणेश पवार व सत्येन जाधव यांना सांगितल्यावर त्यांनी मला कुमठा नाका येथे धनुर्विद्या सुरू करा, अशी कल्पना दिली. तिथं सर्व काही झाडी झुडपे असल्याने आर्थिक भुर्दंड भरपूर होता. तसे सर्व खेळाडूंना खुप लांब देखील होते पण प्रत्येक पालकांची समजूत काढून सर्व पालकांकडून थोडे थोडे पैसै गोळा करून सर्व क्रीडांगण स्वच्छ केले. मागील भिंती बांधल्या पण काही क्रीडा विरोधी लोकांनी ४ वेळा भिंत पडली आणि आम्ही परत ती बांधली. शेवटी त्यांनी माघार घेतली व आमचा प्रवास सुरू झाला. आता खेळाडूना पहाटे ५.३० ते दुपारी १ व परत ३ ते ७ असा सरावासाठी वेळ मिळू लागला. त्याच खेळाडूमधील श्रेया परदेशी, तनिष्का ठोकळ, प्रगती शिंदे, स्वरीत धवन, साईराज हाणमे, सिद्धार्थ साखरे या खेळाडूंना सोनीपत येथे निवड चाचणीसाठी घेण्यात आले. यातील तनिष्का ठोकळ पुर्ण भारतात १३ वी सिद्धार्थ साखरे पूर्ण भारतात ११ वा श्रेया परदेशी पुर्ण भारतात ११ वी व साईराज हानमे पुर्ण भारतात १ पहिलं बसला. तनिष्का ठोकळने सिंगापूर येथे झालेल्या आशिया कप स्पर्धेत जागतिक विक्रमासह रौप्य पदक प्राप्त केले

## यापुढे आणखी आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील

एवढ्या दिवसाचे जे सोलापूर जिल्हाचे स्वप्न होते की राष्ट्रीय स्पर्धेत सोलापूरला अनेक पदक असतात पण भारतीय संघात का नाही. साईराज याने सिध्द करून दाखवले की सोलापूर मधील देखील खेळाडू हे भारतीय संघात प्रथम क्रमांकाने निवडून येऊ शकतो.. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत सातत्य ठेवल्यास यश हे नक्की मिळते. अडचणी या खुप मोठ्या असतात पण त्यापेक्षा ही मोठी ही आपली जिद्द , आपले सातत्य असणे गरजेचे आहे. साईराज जो भारतीय संघाचा मार्ग उघडला त्याच मार्गे दुसऱ्याच दिवशी सातारा येथे सरावासाठी असणारी वैष्णवी पाटील हीची देखील भारतीय संघात निवड झाली. आता ही वाट सोलापूरच्या प्रत्येक खेळाडूसाठी मोकळी झाली आहे. नक्की या पुढील अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सोलापूरमधील अनेक खेळाडू दिसतील. तसेच या २०२८च्या ऑलिम्पिकमध्ये धनुर्विद्यामध्ये सोलापूर मधील यातील खेळाडू दिसतील अशा विश्वास देतो.

### आयुष्यातील सर्वात विस्मरणीय क्षण

**जिथे आपण आल्यापासून जीवनाचे सर्व काही चित्र हे बदलत गेले. त्या जुन्या खुप काही वाईट आणि काही गोड आठवणी ना आज माझ्या गुरूंनी शब्दरुपी आठवणानीना उजाळा दिला. तो दिलेला पहिला रूथ इंडियाचा धनुष्यावर ज्याच्यावर मी आर्चरीचे धडे गिरवले. आम्ही केलेल्या त्या वेळीच्या तडजोडी तसेच माझ्या वर्गातील शिक्षक यांच्याबद्दलचे माझे तक्रारी सर कश्या पद्धतीने हाताळून घ्यायचे ते क्षण. क्रिकेट, सॉफ्टबॉल, बेसबॉल, हॉकी हे सर्व खेळासोबत त्यांनी दिलेले हे मोलाचे धनुर्विद्या खेळाचे आकर्षण निर्माण करणे तसेच त्यांनी सांगितलेल्या प्रत्येक मार्ग मी पुर्ण करत गेलो. त्यांनी जी अपेक्षा ठेवली होती ती आज माझ्याकडून पूर्ण होत आहे. ज्या कॉलेजमध्ये शिकलो तेथीलच मुलगा भारतीय संघात निवड झाली तसेच माझी देखील भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झाली त्याबद्दल माझ्या सर्व गुरुजनांनी मिळून माझ्या यशाला त्यांच्या आशीर्वादाची जोड दिली. ज्याने जे यश मिळाले त्याचा आनंद आज सहस्त्रपटीने वाढला. अश्या या सर्व माझ्या गुरुजनांचा मी खूप खूप ऋणी आहे. हे असे काही ऋण माझ्यावर सर्व गुरुजन यांनी केले त्यातून मुक्तता ही अशक्य बाब. जसे आईने केलेल्या प्रेमाची आपण शब्दात मांडणी कधी करू शकत नाहीत तसेच आज मी या केलेल्या प्रेमाची मी शब्दात मांडणी मी करू शकत नाही.**

## गुरुजणांचा कायमचा ऋणी

या सर्व परिस्थितीमध्ये माझे गुरुवर्य प्रा.संतोष गवळी, प्राचार्य सुरेश पवार, अरुण मित्रगोत्री तसेच कायमच माझ्या पाठीशी असणारे प्रा.सचिन गायकवाड आणि कायम पाठिंबा देणारे जिल्हा सचिव हरिदास रणदिवे व शुभचिंतक यांचा मी शतशः आभारी आहे. आपण जो माझ्यावर विश्वास दाखवला तसेच जी काही जबाबदारी दिली त्यास मी सार्थ ठरो असा आशीर्वाद तुमचा कायम असो. यांचा या यशात खुप मोलाचं वाटा आहे. त्याबद्दल मी त्याचा कायमचा ऋणी राहील. त्यांचाकडून मी एवढीच अपेक्षा कायम करेन की त्यांनी माझ्यावर असाच विश्वास ठेऊन प्रोत्साहन देत रहावे.

- शब्दांकन : अजितकुमार संगवे

९८८११३३१०३




# लोकनेते बाबुराव आण्णा पाटील अनगरकर यांचे जीवन कार्य

कै. बाबुराव (आण्णा) पाटील यांचा जन्म अनगर येथे खानदानी पाटील घराण्यात १ ऑगस्ट १९१७ रोजी झाला. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस सामाजिक चळवळीची पताका सोलापूर जिल्ह्यात फडकविणारे एक तेजस्वी पुरुष सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक क्रांतीच्या क्षितिजावर तळपू लागले, ते पुरुष म्हणजे अनगरकरांचे लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील होय. ज्या काळात महाराष्ट्रातील इतर वतनदार इंग्रज सरकारच्या दडपणाखाली व आपल्या स्वार्थासाठी आपल्या अधिकाराचा योग्य वापर करून सर्वसामान्य लोकांना त्रास देत होते. त्या काळात अण्णांनी आपल्या अधिकाराचा योग्य वापर करून सर्वसामान्य न्याय देण्याचे काम केलं. शेतकऱ्यांनी रक्ताचं पाणी करून पिकवलेली ज्वारी त्याला बाजारात विकता येत नव्हती. सरकार दरबारी लेव्हीच्या नावाने मातीमोल दरात ज्वारी विकावी लागत होती. याच काळात ब्रिटिशांनी सर्व महाराष्ट्रभर धान्य बंदीचा आदेश दिलेला होता. या काळात सर्व सामान्य लोकांसाठी कुठेही धान्य उपलब्ध होत नव्हते. यावेळी सर्वसामान्य जनतेसाठी आण्णांनी ब्रिटिशांचा विरोध पत्करून प्रसंगी आपल्या प्राणाचीही परवा न करता स्वतः च्या मळ्यात बाजार भरविला व तो सर्व सामान्यांसाठी खुला केला. या गोष्टीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात अण्णांची ओळख धान्य पुरविणारा पाटील अशी झाली.

लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील मोठा व्यक्तिमत्व आहे. इ .स. १९४२ चलेजाव' च्या आंदोलनापासून ते १९९५ पर्यंत जिल्ह्याच्या अनेक लहान-मोठ्या घडामोडीत भाग घेतलेला आहे. समराजकारणात जीव धोक्यात घालून, प्रसंगी प्राणाची ही परवा न करता मोठमोठ्या अवघड व नाजूक कामगिरी पार पाडल्या. अण्णा १९५२ साली प्रथम मोहोळ माढा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले. तिथून आण्णांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. तेथूनच पुढे ५ दशके अण्णांनी सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावरील व सहकारावरील पकड कायम ठेवली. आण्णांनी इतर कार्याबरोबर शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचे कार्यही केले. या देशातील ग्रामीण जनजीवन हे शेतीवर अवलंबून असून शेतकरी सुखी व समाधानी नव्हता. अज्ञान, कर्जबाजारीपणा, दुष्काळ या संकटाने तो उध्वस्त होत होता. आण्णांनी शेतकऱ्यांसाठी खरेदी विक्री संघाची स्थापना व कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना केली. अण्णांनी विविध क्षेत्रात कला सादर करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात केलं. ज्या काळात महाराष्ट्रातील इतर वतनदार तमाशा या लोकनाट्य कडे फक्त आपले करमणुकीचे साधन म्हणून पाहत होते.

**विनम्र अभिवादन** **विनम्र अभिवादन** **विनम्र अभिवादन**

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मी मिळवणारच असे ठणकावून सांगणारे **लोकमान्य टिळक**

दीनदलित, दुळव्यांच्या उन्नतीसाठी सातत्याने संघर्ष करणारे, श्रमिकांचे कैवारी, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे असे टासून सांगणारे **आण्णाभाऊ साठे**

आणि ब्रिटीशांच्या अन्यायाविरुद्ध लोकलढा उभारुन गोरगरिबांसाठी बाजार खुला करणारे झुंजार नेतृत्त्व

**लोकनेते माजी आमदार स्व. बाबुराव आण्णा पाटील यांना विनम्र अभिवादन**







त्या काळात आण्णांनी तमाशा या लोककलेला मोठ्या प्रमाणात आश्रय दिला. तमाशा या कलेबरोबर आण्णांनी मल्ल विद्येलाही प्रोत्साहन दिले. अनेक मुलांना आर्थिक मदत केली. ग्रामीण भागातील तरुणांना मल्लविद्यांमध्ये वाव मिळावा म्हणून अण्णांनी अनगर येथे स्वखर्चाने आखाडा बांधला. या आखाड्यामध्ये महाराष्ट्रात सह भारतातील अनेक नामवंत मल्लांना अनगर येथे बोलावून त्यांचा यशोचित गौरव केला. १९७२ साली सर्वत्र भयानक दुष्काळ पडलेला होता. यावेळी वैराग येथील शासकीय गोदामावर आण्णांच्या नेतृत्वाखाली चंद्रकांत निंबाळकर व वैराग येथील स्थानिक लोकांनी मोर्चा काढला. यावेळी या मोर्चाल थोपविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला.यामध्ये ८ नागरिकांचा मृत्यू झाला.यावेळी आण्णांनी मृत नागरिक व शेतकऱ्यांसाठी निधी गोळा करण्याचे आव्हान केले .

भीमा सहकारी साखर कारखाना टाकळी सिकंदर या कारखान्याची स्थापना कोल्हापूर येथील प्रसिद्ध उद्योगपती कै.भीमराव महाडिक यांनी मोहोळ तालुक्यातील १९७४/७५ साली केली .

भीमा कारखाना हा मोहोळ पंढरपूर व मंगळवेढा तालुक्याच्या सरहद्दीवर आहे व त्याचे कार्यक्षेत्र ही या तिन्ही तालुक्यात विखुरलेले आहे.या कारखान्याची स्थापना जरी कै. भीमराव महाडिक यांनी केलीली असली तरी सुद्धा या कारखान्याच्या उभारणीमध्ये अण्णांचे योगदान मोठ्या प्रमाणावर आहे .अण्णांच्या सहकार्याशिवाय हा कारखाना उभारू शकत नाही याची जाणीव सर्वांना असल्यामुळे सर्वांनी आण्णांना बरोबर घेऊन हा कारखाना उभा केला ,अनगर व अनगरच्या परिसरातील भाग भीमा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात येत नसताना सुद्धा अण्णांनी या कारखान्याचे भाग भांडवल मोठ्या प्रमाणात गोळा करण्यास मदत केली . १९४२ साली सातारा येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी पत्री सरकार ही संघटना स्थापन केली होती . आण्णांनी या संघटनेच्या भूमिगत राहणाऱ्या लोकांना अन्न ,धान्य पुरवण्याचा व अन्य भरपूर मदत केली . आण्णांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांना नुसती मदतच नाही तर क्रांतिसिंह नाना पाटील यांना अनगर येथे आणून त्यांची १०१ बैलगाड्या मधून भव्य मिरवणूक काढून त्यांचा मोठा सन्मान केला .लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटीलयांची चिरंतन आणि अविस्मरणीय कामगिरी म्हणजे लोकनेते बाबुराव (अण्णा)पाटीलसाखर कारखाना होय.मोहोळ तालुक्यातील पिकणाऱ्या नगदी पिकांपैकी एक पीक म्हणजे ऊस होते. म्हणून शेतकऱ्यांसाठी एक साखर कारखाना असावा अशी आण्णांची इच्छा होती .परंतु सतत राजकीय विरोधी राजवटीत असल्यामुळे आण्णांना सहकारी साखर कारखाना काढणे शक्य झाले नाही .सन १९९९ साली साखर कारखान्याचे खुले धोरण झाल्यानंतर लोकनेते साखर कारखान्याची स्थापना आ .राजन बाबुराव पाटील यांनी केली.

श्री .अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ ,अनगर या संस्थेची स्थापना लोकनेते बाबुराव (आण्णा)यांनी इ.स. १९६७ साली केली.या संस्थेने मोठ्या प्रमाणात शिक्षण क्रांती केली असून अनगर,गोटेवाडी व खुनेश्वर या ठिकाणी संस्थेची माध्यमिक विद्यालय आहेत,तर अनगर येथे कनिष्ठ महाविद्यालय व सीनियर कॉलेजेस आहेत .ग्रामीण भागातील लोकांना शेतीची माहिती व्हावी यासाठी कृषी डिग्री डिप्लोमा चे कॉलेजेस सुरू केलेले आहे . आण्णांनी आपल्या कर्तुत्वाने अनगर परिसराचा विकास घडवून आणलेला आहे .गावातील मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे .शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन सन्मान केलेला आहे .शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यास आधुनिक पद्धतीने शेती करण्यास प्रोत्साहित केले .शेती पूरक जोड व्यवसायास सहकार्य केले .शेतकऱ्यांच्या मालास बाजारपेठ उपलब्ध करून दिली .कौटुंबिक वाद-विवाद जागा ,जमीन यावरून तंट्याचे निवारण गाव पातळीवर करून वंचितास न्याय मिळवून दिला .

गावाची एकता टिकवून सामतस्यांतून गावचा नावलौकिक वाढवून आण्णांची शिकवण आचरणात आणण्यास आम्ही बांधील आहोत . आण्णांच्या आदर्श कार्यास व पवित्र स्मृतीस मानाचा मुजरा! मानाचा मुजरा!! मानाचा मुजरा!!!

**- श्री. बजरंग सुभाष पाचपुंड**
(एम .ए . बी . एड . एम फिल )
कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अनगर. ता.मोहोळ जि.सोलापूर







